संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



आपली निशाणी
तुतारी वाजविणारा माणूस

परिवर्तन घडणार, नगर बदलणार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर<br>Abhishek Balasaheb Kalamkar | | |

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

प्रकाशक : निलेश मालपाणी, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)



रजि नं. ११४३९-५७/७७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ११.११.२०२४ | अंक नं. २११ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!
खरेदी करा आणि जिंका 31 दिवस 21 लाखांची बक्षिसे
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

ISO 9001:2008
भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.केडगाव

| मुदत ठेव | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवसाकरिता | ८ % |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ९ % |
| ९१ दिवस ते ३६५ दिवस | १० % |
| १२ महिने ते १७ महिने | १०.५० % |
| १८ महिन्याच्या पुढे | ११ % |
| मसिक ठेव (संचित मुदत ठेव) | ८% |
| दैनंदिन ठेव (बिंदूसागर ठेव) | २.५०% |
| व्यक्तीगत सेव्हिंग्ज ठेव (द.सा.द.शे) | ५% |

आपल्या विश्वासाची भैरवनाथ पतसंस्था केडगाव, नगरकरांच्या सेवेत घेऊन येत आहे
सुवर्ण कर्ज व ठेव योजना
सर्व ठेवी ज्येष्ठ नागरिक ०.५०% (अर्धा टक्का व्याज) जादा

शाळा/कॉलेजमध्ये आपल्या पाल्यांच्या सुरक्षेबाबत निश्चिंत व्हा...
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
98222 94622 | 94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

Sintex
PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road, Ahmednagar. Mob 9422224990

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999


# नगर शहर व उपनगर परिसरात चोऱ्या, घरफोड्यांचे सत्र सुरूच

## केडगाव, माणिकनगर पाठोपाठ रेल्वे स्टेशन, नागरदेवळे येथे घरे चोरट्यांनी फोडली; पोलिसांसमोर मोठे आव्हान

नगर - शहरासह उपनगरात चोऱ्या, घरफोड्यांचे सत्र सुरूच आहे. केडगाव उपनगरात कपड्याचे दुकान, व्यावसायिकाचे घर तसेच माणिकनगर येथील व्यावसायिकाचे घर फोडून लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेल्याच्या घटना ताज्या असताना रेल्वेस्टेशन परिसरातील इंगळे वस्ती तसेच नागरदेवळे परिसरात सादिक मळा येथेही घरफोड्या झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. शहर परिसरात सुरु असलेल्या या चोऱ्या घरफोड्यांमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. चोरटे दररोज चोऱ्या, घरफोड्या करत असताना पोलिसांना ते सापडत नसल्याचे दिसून येत आहे.

घरातील पर्समध्ये ठेवलेले सुमारे २२ ग्रॅमचे सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रेल्वेस्टेशन परिसरातील इंगळे वस्ती येथे घडली. या प्रकरणी काजल आकाश पंधारे (वय २५,रा. साईआनंद लॉन्स पाठीमागे, पोखर्डी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी दिवाळी सणानिमित्त माहेरी इंगळे वस्ती येथे आल्या आहेत. त्यांनी शुक्रवारी (दि.८) रात्री जेवण झाल्यानंतर साडेअकरा वाजता गळ्यातील गंठण त्यांच्या पर्समध्ये ठेवले व पर्स हॉलमधील सोफासेटवर ठेवली होती. दुसर्या दिवशी शनिवारी (दि.९) सकाळी साडेसात वाजता फिर्यादीला हॉलमधील सोफासेटवर ठेवलेली पर्स दिसून आली नाही. त्यांनी घरात सर्वत्र शोध घेतला असता पर्स मिळाली नाही. घराच्या बाहेर कंपाऊंडच्या आत जावून पाहिले असता पर्स व त्यातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले.

त्यातील गंठण त्यांना दिसून आले नाही. ते चोरून नेले असल्याची त्यांची खात्री झाली. झोपायच्या वेळी नकळत घराच्या दरवाजा लावायचा विसरल्यामुळे चोरट्याने आत प्रवेश करून पर्स मधील गंठण चोरून नेले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. घटनेची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस अंमलदार शरद वाघ करत आहेत.

घरफोडीची दुसरी घटना नागरदेवळे परिसरातील सादिक मळा येथे शनिवारी (दि.९) रात्री ११ ते रविवारी (दि.१०) सकाळी ६ या कालावधीत घडली आहे. या बाबत आशा रामदास पांढरे (रा.सादिक मळा, नागरदेवळे) यांनी भिंगार कम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शनिवारी रात्री फिर्यादी या घरात झोपलेल्या असताना अज्ञात चोरट्याने घराच्या गेटचे कुलूप तोडून आणि दरवाजाच्या आतील कडी कोयंडा उचकटून घरात प्रवेश केला.

घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र, कानातील टॉप्स व ४ हजारांची रोकड असा २५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. चोरीची ही घटना सकाळी उघडकीस आली. त्यानंतर आशा पांढरे यांनी भिंगार कम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### पोलिसांकडून मुद्देमाल कमी दाखवण्याचा प्रयत्न

चोरी, घरफोडी झाल्यावर पोलिस ठाण्यात फिर्याद द्यायला गेलेल्या नागरिकांना गुन्हा दाखल करण्यासाठी मोठ्या दिव्यातून जावे लागत आहे. नागरिकांना पोलिस ठाण्यात तासन तास बसून ठेवले जाते, चोरीला गेलेल्या मुद्देमालाबाबत पोलिसांकडून अनेक प्रश्नांची सरबत्ती केली जाते. तुम्ही एवढे दागिने कोठून आणले, ते घरातच का ठेवले? रोकड कुठून आली? अशा एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे देताना फिर्याद देण्यास आलेल्या नागरिकांच्या नाकी नऊ येतात.

एवढे सगळे झाल्यावरही पोलिसांकडून फिर्यादीत चोरीला गेलेला मुद्देमाल कमी दाखवला जात असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. गुन्ह्याचे गांभीर्य कमी करण्यासाठी पोलिसांकडून हे प्रकार केले जात आहेत काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची मागणी होत आहे.


फर्निचर विकणे आहे
उत्तम कंडिशन मध्ये
सोफासेट - ३
डबल बेड - २
डायनिंग टेबल व ६ खुर्ची
गिझर १, वॉशींग मशीन-१
8087825002

पाहिजे
को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी करिता
मॅनेजर पाहिजे
संपर्क
9822024505

काय आपण आपल्या जुन्या अपार्टमेंटच्या इमारतीच्या Redevelopment / Self-redevelopment चा विचार करीत आहात?

एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली "(UDCPR) नियमांमुळे नगर शहरात जुन्या इमारतींचा पुनर्विकास (Redevelopment) मोठ्या प्रमाणात सुरु आहे किंवा होणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने काही मार्गदर्शक नियम तयार केलेले आहेत व त्या मार्गदर्शकांच्या अधीन राहूनच आपण आपल्या इमारतीचा पुनर्विकास करणे गरजेचे आहे. यासाठी इमारतींचा पुनर्विकास (Redevelopment) करण्यासाठी योग्य व माहितगार (PMC) सल्लागार असणे गरजेचे आहे. PMC (Project Management Consultant) म्हणून आम्ही आपणास इमारतीच्या पुनर्विकास ची पद्धत, त्यासाठी लागणारी कागदपत्रे, आपल्या अपार्टमेंटचा Feasibility Report तयार करुन जुन्या मूळ सभासदांना त्यांच्या हक्काचे होणारे फायदे मिळवून देणे, विकासक /ठेकेदार निवडण्याचे निकष, करारनामा कसा करावा, महारेरा नोंदणी इ .चे अचूक मार्गदर्शन व सल्ला आमची Team (Architect, CA, Structural Engineer, Legal Advisor, site Supervisor, etc) आपणास देईल तसेच आपल्या इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होऊन राज्य सरकारने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सभासदांना वेळेवर ताबा मिळवून देण्यासाठी आमची Team आपल्या बरोबर राहील.

Er Prakash Jain B.E.(Civil) Mob : 9422220762
"Adarsh Consultancy"
( RERA & Redevelopment Consultant)
O-1, Adarsh Samruddhi Apt., Chowpatty Karanja, A'Nagar


# मैलामिश्रित सांडपाणी रस्त्यावर

## डेंग्यू, मलेरियामुळे आरोग्य धोक्यात

नगर - केडगावमधील दिपनगरमध्ये अनेक दिवसापासून कॉलनी ४ मध्ये ड्रेनेजलाईन तुंबल्यामुळे अनेकांच्या दारामध्ये मैलामिश्रित पाणी वाहू लागले आहे. अनेक दिवसापासूनची असलेली ड्रेनेज वारंवार तुंबल्यामुळे घरातील सांडपाणी व शौचालयाचे पाणी अनेक घरांच्या दारामध्ये वाहू लागले आहे. सदर पाण्याचा निचराच होत नसल्यामुळे हे पाणी घरासमोरून वाहत असल्याचे दिसत आहे. पिण्याचे पाणी सुटल्यानंतर तर या ठिकाणी या मैलामिश्रित पाण्यामुळे रहिवाशांमध्ये किरकोळ वाद देखील होत आहेत. या कॉलनीमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, अनेकांना चिकनगुनिया, डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजाराने ग्रासले आहे.




केडगावमधील दिपनगरध्ये अनेक दिवसापासून अनेकांच्या दारामध्ये मैलामिश्रित पाणी वाहत असल्याचे दिसत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. (छाया - अमित मन्यार)

येथील नागरिकांनी आपल्या समस्या अनेक वेळा वारंवार लोकप्रतिनिधींकडे मांडल्या देखील परंतु आजतगायत कोणीही या समस्या सोडविल्या नसल्याचे येथील नागरिक बोलू लागले आहेत. आम्ही फक्त मतदानापुरते आठवतो का? असा सवालही आता रहिवासी उपस्थित करू लागले आहेत. दिपनगरमध्ये कॉलनी ४ मधील रहिवासी राजे प्रतिष्ठानचे अनिल राजे झिरपे, अर्जुन मेढे, निसार पठाण, तुकाराम नगरे, मेजर सलीम शेख, मारुती पवार, किशोर जम दाडे यांनी या समस्या लवकरात लवकर सुटल्या नाही तर आम्ही मतदानाचा हक्क बजावणार नसल्याचे यावेळी सांगितले. जर आम्हाला पायाभूत सुविधाच मिळत नसतील तर मतदान कशासाठी करायचे? असा सवाल आता येथील रहिवासी उपस्थित करू लागले आहेत.


Career Ki Shuruwat DISHA ke saath
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Accounting & Taxation
च्या क्षेत्रात विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती हेच आमचे ध्येय
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Duration : 6 Months
Experienced Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
Delhi Gate Branch – 9371051769
Old ST stand Branch – 9371151769
Pipeline Branch – 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## भक्तीधर्म व भक्तीयुगाचे प्रवर्तक संत नामदेव

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

। ज्ञानदेवे रचिला पाया ।। तुका झालासे कळस ।। सामान्यतः हे सगळेच जाणतात. पाया आणि कळस अत्यंत महत्त्वाचे असले तरी त्यांच्या पूर्णत्वासाठी पूर्ण इमारत, प्रकल्प वा उद्देशाच्या संपूर्णत्वासाठी मधला भागही तितकाच महत्त्वाचा असतो. किंबहुना त्याच्याशिवाय पाया अन् कळस पूर्ण होऊच शकत नाही.

संतश्रेष्ठ नामदेव. ज्ञानेश्वर माऊलींच्या समकालीन. यांचं लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे उत्तर-वायव्य भारतासह भागवत धर्माची पताका त्यांनी सर्वदूर फडकवली.

परमात्म्याचा आशीर्वाद व मनात असेल तर आपलं ब्रीद राखून, सरकारी वा अन्य मदत न घेता काम करता येतं हे नामदेवांनी दाखवून व करून सांगितलं. त्यांच्या सामर्थ्याने भक्ती व जाती-धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्था उभी राहू शकली. कुठलीही घोषणा अथवा शब्दांचे बंबाळ न करता, ईश्वराची भक्ती करता करता समाजाचं ऐक्य साधता येतं हेच नामदेवरायांनी दाखवून दिलं होतं.



जुलमी यवनी सत्तेला त्यांनी प्रत्यक्ष कुठेही विरोध केला नाही पण त्यांची भक्तीनिष्ठा एवढी प्रखर होती की यवनी सत्तेलाही त्यांचा नाद सोडावा लागला. त्यांची भक्ती अंधश्रद्धा नव्हती तर डोळस व शुद्ध होती.

राजस्थानात गभरी गावी तर अमृतसर नजीकच्या घुमान गावी त्यांनी विठोबा रुखमाईचे मंदिर उभारले. गुजरात, राजस्थान, पंजाब, वायव्य भारत, काशी इ. विविध ठिकाणी धर्मशाळा, पाणवठे, समाजमंदिरे उभारली. म्हणूनच भागवत धर्माच्या प्रचारा-प्रसारात संत नामदेवांचे कार्यकर्तृत्व लक्षणीय, वंदनीय आहे.



नगर शहर विधानसभा मतदारसंघात गृहमतदानाची प्रक्रिया पार पडली.

## अहमदनगर मतदारसंघात १३३ मतदारांचे गृहमतदान

नगर - विधानसभा निवडणूक अंतर्गत अहमदनगर शहर मतदारसंघात गृहमतदानासाठी सहमती दर्शविलेल्या १४३ मतदारांपैकी १३३ मतदारांनी गृहमतदान केले. उर्वरीत १० पैकी दोघांचा मृत्यू झाला असून ३ पुणे येथे रुग्णालयात उपचार घेत असल्याने त्यांचे गृहमतदान होवू शकले नाही. इतर ५ मतदारांकडे मतदान पथक रविवारी जाणार आहे. निवडणूक निरीक्षक ताई काये आणि निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांनी गृहमतदान प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी सहा निवडणुक अधिकारी संजय शिंदे आणि समन्वयक अधिकारी सपना वसावा उपस्थित होते. ८५ वर्षापेक्षा अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी निवडणूक आयोगातर्फे ही सुविधा देण्यात आली आहे.

# योग्य उमेदवार मतदार जागृती अभियान...

### सदर जरूर वाचा आणि आपल्या शहराचे भवितव्य घडवा... वाचाल तर वाचाल... पुढच्या पिढीला देखील वाचवाल

प्रिय मतदार बंधू आणि भगिनींनो... हा आवाज आता रोज दिवस-रात्र तुमच्या कानावर विविध माध्यमांमधून आदळत असेल ..

तुम्हालाही मनातून थोडं बरं वाटत असेल की, कोणीतरी आपल्याला प्रिय म्हणतो आहे... पण मित्रांनो हे सगळं लबाडांच आवताण आहे.. तुम्ही कोणलाही प्रिय नसता.

एकदा निवडून आल्यावर तुम्ही खड्ड्यात गेले तरी चालेल तुमचं कोणीही काही ऐकायला तयार नसतं..

ही परिस्थिती बदलण्यासाठी दुसऱ्या कोणाला दोषी न धरता प्रथम स्वतःकडे बोट दाखवून घेणे गरजेचे आहे...

जे बोट मतदानाच्या दिवशी शाई लावून आपण काळं करून घेतो, त्यानंतर निवडून आलेले लोक त्यांचा तोंड काळ करून निघून जातात.. परत पाच वर्षांनी भेटण्यासाठी... हा सर्वसामान्य अनुभव आहे.

यातून थोडा शहाणपण येण्याची गरज आहे, म्हणून नीती अनिती, पाप-पुण्य आणि समाज यासाठी आपण एकटे देखील काहीतरी करू शकतो, असा विश्वास असणाऱ्या संवेदनशील आणि बुद्धिमान लोकांसाठी दैनिक नवा मराठाच्या माध्यमातून हे मतदार जागृती अभियान हे सदर आजपासून सुरू करत आहोत.. रोज आठवणीने वाचा... **वाचाल तर वाचाल... पुढच्या पिढीला देखील वाचवाल.**



नेमेची येतो पावसाळा या म्हणी प्रमाणे निवडणुका येतात आणि जातात.. तशी आपली विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे, मित्रांनो हल्ली निवडणुका आणि मतदान हा चेष्टेचा विषय झालेला आहे, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यामुळे जगातल्या सगळ्यात मोठ्या आपल्या देशाच्या लोकशाहीचा अर्थ.. लोकांची शाही असा न राहता केवळ शाही लोकांचे राज्य असा होऊ लागलेला आहे.

मतदान हे आपले श्रेष्ठ कर्तव्य आहे ते विसरून आपण बरेच जण त्या दिवशी अक्षम्य टाईमपास करतो, चावडीवर बसून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मोठ्या मोठ्या गप्पा मारतो कोण कुठे चुकलं याचा हिशोब मांडत राहतो, चेष्टा मस्करी करून टीव्हीच्या स्क्रीन समोर बसून मनोरंजन करून घेतो..

याचा काय परिणाम होतो? तर आपलीच नंतरच्या पाच वर्षांसाठी कुचेष्टा होते, आपल्या उदासीनतेमुळे ५०-६० टक्क्यांचे जेमतेम अधिकतम मतदान होते मग शंभर पैकी फक्त ५० लोकांची मतं घेऊन ... त्या ५० मतांपैकी पण २५ मत पाहुण्याची मेव्हणे आणि मेहुण्याची पाहुणे, लाभार्थी आणि पैसे देऊन विकत घेतलेले मतं असतात...मग अजिबात लायकी नसलेला उमेदवार सुद्धा निवडून येतो, मग घोडेबाजार होतो, आणि मग पुढची पाच वर्ष अशा तंबाखूछाप उमेदवारांचा कारभार आणि नंगानाच हतबलपणे पाहत राहण्यापलीकडे आपण काहीही करू शकत नाही ..

यापेक्षा लोकशाहीचं मोठं अपयश ते काय असू शकतं? चला तर मग जरा वेगळं काहीतरी करूया!

उदासीनता सोडून सक्रिय होऊया ... घरात आळशी माणसासारखं पडून राहण्यापेक्षा मोठ्या संख्येने घराबाहेर पडून योग्य उमेदवारालाच मतदान करूया..!!

आता तुम्ही म्हणाल कसं काय ओळखायचा तो योग्य उमेदवार. आम्हाला तर सगळे सारखेच बेकार असे वाटत आहेत.. तर तुम्ही बरोबर प्रश्न विचारत आहात..

योग्य उमेदवार या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी आणि यासंबंधीच्या अनेक उद्बोधक आणि मनोरंजक माहितीसाठी उद्यापासून रोज हे मतदार जागृती अभियान सदर जरूर वाचा आणि आपल्या शहराचे भवितव्य घडवा ...

आणि जर तुम्ही एवढे देखील करू शकत नसाल तर मग पुढे पाच वर्ष होणाऱ्या खेळ खंडोबा बाबत कुठलीही तक्रार करण्याचा.. नाराजी व्यक्त करण्याचा तुम्हाला काहीही अधिकार नाही हे लक्षात घ्या..

- **सुहास मुळे**, अध्यक्ष, जागरूक नागरिक मंच, मोबा. ९००२६६८५५५

# नागरिकांनी मतदान करून लोकशाही बळकट करण्यासाठी पुढे यावे

### जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे आवाहन; 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' जिल्हास्तरीय मतदान जनजागृती कार्यक्रमाचा शुभारंभ

नगर - महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निमित्त मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम (स्वीप) अंतर्गत मतदार जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ येथील प्रोफेसर चौकात जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आला. नागरिकांनी देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.





'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' जिल्हास्तरीय मतदान जनजागृती कार्यक्रमाचा शुभारंभ करताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

केंद्रीय संचार ब्युरो आणि जिल्हा प्रशासनातर्फे आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी पी. फणीकुमार, गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव, मतदारदूत अमोल बागूल आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात ७५ टक्के मतदानाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यादृष्टीने मतदार जागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येकाच्या मताला महत्त्व आहे. मतदानाच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा उमेदवार निवडता येतो. त्यामुळे प्रत्येक मतदाराने २० नोव्हेंबर रोजी मतदान केंद्रांवर जावून कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करावे आणि जिल्ह्यात विक्रमी मतदान घडवून आणावे, असे आवाहन त्यांनी केले.

मतदारांसाठी मतदान केंद्रांवर महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आदींच्या मतदानासाठी विशेष सुविधा करण्यात आली आहे. तसेच पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आदी किमान आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत. मतदारांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढावा यासाठी प्रशासनातर्फे असे प्रयत्न करण्यात येत आहे. मतदारांनीदेखील या प्रयत्नात सहभागी व्हावे आणि मतदानाचा हक्क बजवावा, असे श्री.सालीमठ म्हणाले.

याप्रसंगी कला पथकाने लोकशाहीचा पोवाडा सादर केला. सी.एस.आर.डी. व समाज कार्य संशोधन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे मतदानाचा संदेश दिला.

केंद्रीय संचार ब्युरोतर्फे जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघात चित्ररथ आणि कलापथकाच्या माध्यमातून मतदार जागृती करण्यात येणार आहे. या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश मतदारांमध्ये निवडणुकीतील सहभागाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि मतदारांची सक्रिय भागीदारी निश्चित करणे हा आहे. त्यादृष्टीने या कार्यक्रमात विविध कला सादरीकरणातून मतदार जनजागृतीचा संदेश देण्यात येणार आहे.

## मंगल भुजबळ यांच्यासह १६ बंडखोर उमेदवारांचे काँग्रेस पक्षातून 'निलंबन'

नगर - विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार व काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात बंडखोरी करणाऱ्या काँग्रेसच्या १६ उमेदवारांविरोधात पक्षाने शिस्तभंग केल्याचा ठपका ठेवून त्यांना पक्षातून सहा वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे. यामध्ये अहमदनगर शहर मतदार संघातून अपक्ष उमेदवारी करणाऱ्या काँग्रेसच्या सौ. मंगल विलास भुजबळ यांचा समावेश आहे. यासंदर्भातील आदेश पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जारी केले आहेत.

### सौ. मंगल गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील सौ. मंगल अशोक गायकवाड (वय ६०) यांचे ८ नोव्हेंबर रोजी उरण इस्लामपूर (ता. वाळवा, जि. सांगली) येथे अल्प आजाराने निधन झाले.



राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (भारत सरकार)चे उपसंचालक तसेच नगर अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत.

### श्रीमती कमल थोरात यांचे अल्पशा आजाराने निधन

संभाजीनगर - येथील कमल पंडीतराव थोरात (वय ८०) यांचे ११ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील बनेवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक इंद्रजित थोरात यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### शहाजी माने यांचे हृदयविकाराने निधन

श्रीगोंदा - येथील काष्टीतील रहिवासी कै. बाबा नजू राहिंज विविध कार्यकारी सेवा संस्थेचे संचालक शहाजी साहेबराव माने (वय ६७) यांचे ११ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर घोडनदी तिरी काष्टी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



सहकार महर्षी काष्टी सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष काळूराम माने यांचे ते बंधू होत. त्यांच्या मागे भाऊ, बहिण, २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# आम्ही शांततेच्या मार्गाने, अहिंसेचा आदर्श ठेऊन, सेवा करत राहू

### 'आनंदधाम' येथे कुंदनऋषीजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त धार्मिक परीक्षा बोर्डावर अभिषेक कळमकर यांचे आश्वासन

नगर - आनंदधाम येथे कुंदनऋषीजी महाराज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून धार्मिक परीक्षा बोर्डावर जाऊन दर्शन घेण्यात आले. या वेळी महाविकास आघाडीचे भगवान फुलसौंदर, विक्रम राठोड, संभाजी कदम यांसह अनेक कार्यकर्ते, अनुयायी आणि स्थानिक नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी नगर शहरातील सामाजिक व व्यापारी प्रश्नांवर चर्चा करत, अभिषेक कळमकर यांनी व्यापाऱ्यांना आश्वासन दिले.





आनंदधाम येथे कुंदनऋषीजी म.सा. यांच्या जन्मदिनानिमित्त धार्मिक परीक्षा बोर्डावर बोलताना अभिषेक कळमकर. समवेत महाविकास आघाडीचे पदाधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात सामाजिक व व्यापाऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना अभिषेक कळमकर.

अभिषेक कळमकर म्हणाले, नगरमधील व्यापाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. आम्ही शांततेच्या मार्गाने, अहिंसेचा आदर्श ठेऊन, सेवा करत राहू. त्यांनी पुढे असेही सांगितले की, व्यापाऱ्यांच्या समस्या, त्यांच्या अडचणी आणि त्यांना येणाऱ्या कोणत्याही संकटात महाविकास आघाडी त्यांच्यासोबत ठामपणे उभी राहील.

या प्रसंगी धार्मिकतेचे वातावरण निर्माण झाले होते आणि सर्वांनी कुंदनऋषीजी महाराजांच्या आशीर्वादासाठी प्रार्थना केली. उपस्थित कार्यकर्त्यांनीही शांती व सहकार्याच्या मार्गाने नगर शहरात विकास साधण्यासाठी योगदान देण्याची भावना व्यक्त केली.

# शेअर बाजारात पुन्हा घसरण, सेन्सेक्स ३०० हून अधिक अंकांनी कोसळला

### निफ्टीमध्ये सुमारे १०० अंकांची घसरण; बँकिंग आणि एफएमसीजी शेअर्स घसरले

मुंबई - शेअर बाजारात आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोमवारी (दि.११) घसरण पाहायला मिळत आहे. ३०० हून अधिक अंकांच्या घसरणीसह सेन्सेक्स ७९,१५० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. त्याच वेळी, निफ्टीमध्ये सुमारे १०० अंकांची घसरण आहे, तो २४,०५० च्या पातळीवर व्यवहार करत आहे.

सुरुवातीच्या व्यवहारादरम्यान, सेन्सेक्सच्या ३० समभागांपैकी १९ समभाग घसरत होते आणि ११ वाढले होते. आज बँकिंग आणि एफएमसीजी शेअर्समध्ये मोठी घसरण झाली आहे. त्याचबरोबर ऑटो आणि आयटी शेअर्समध्येही वाढ दिसून येत आहे.

आशियाई बाजारात, जपानचा निक्की ०.३९% नी घसरला आहे. त्याच वेळी, कोरियाचा कोस्पी १.२७% आणि चीनचा शांघाय कंपोझिट देखील ०.०७५% ने घसरला आहे. ८ नोव्हेंबर रोजी, यूएस डाऊ जोन्स इंडस्ट्रियल सरासरी ०.५९% वाढून ४३,९८८ वर आणि S&P ५०० ०.३८% वाढून ५,९९५ वर पोहोचला. Nasdaq ०.०९% वाढून १९,२८६ वर पोहोचला.

NSE डेटानुसार, परदेशी गुंतवणूकदारांनी (FII) ८ नोव्हेंबर रोजी ₹३,४०४ कोटी रुपयांचे शेअर्स विकले. या कालावधीत, देशांतर्गत गुंतवणूकदारांनी (DIIs) ₹ १,७४८ कोटी किमतीचे शेअर्स खरेदी केले.

याआधी शुक्रवारी म्हणजेच ८ नोव्हेंबर रोजी शेअर बाजारात घसरण पाहायला मिळाली. सेन्सेक्स ५५ अंकांच्या घसरणीसह ७९,४८६ वर बंद झाला. निफ्टीही ५१ अंकांनी घसरून २४,१४८ च्या पातळीवर बंद झाला.

# शिवसेना गटाचे नगरसेवक गणेश कवडे यांचा संग्राम जगताप यांना पाठिंबा

### मी केलेल्या विकास कामावर नागरिकांचा विश्वास : आ संग्राम जगताप

नगर - अहिल्यानगर विधानसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांन शिवसेना उबाठा गटाचे माजी नगरसेवक गणेश कवडे यांनी पाठिंबा दिला.

प्रभाग क्रमांक १३ मधून प्रचारार्थ विकास यात्रा काढत नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी ठिकठिकाणी दारासमोर रांगोळी काढून महिला औक्षण करत होत्या. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, दीपक सूळ, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, स्थायी समितीचे माजी सभापती किशोर डागवले, संभाजी लोंढे, दत्तात्रय मुदगल, अजय चितळे, नरेंद्र कुलकर्णी, महेश लोंढे, मयूर बोचुघोळ, सुवेंद्र गांधी, रवी दंडी, कैलास दळवी, गणेश शिंदे, रणजीत परदेशी, मयूर जोशी, काका शेळके, शांताराम राऊत, मुकुंद वाळके, सुहास पाथरकर, नाना देवतरसे, पिंटू पठारे, नितीन डागवाले, सागर गोरे, सुभाष दारवेकर, गोरख पडोळे, उदय अनभुले, गोपाळ वर्मा, बाळासाहेब गायकवाड, बाळासाहेब शेळके, भास्कर कवडे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.



प्रभाग क्रमांक १३ मधून प्रचारार्थ विकास यात्रा काढत नागरिकांच्यावतीने उबाठा गटाचे माजी नगरसेवक गणेश कवडे यांनी महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांना पाठिंबा दिला. (छाया - लहू दळवी)

नालेगाव ग्रामस्थ माझ्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्वजण गटतट विसरून एकत्र येत मला पाठिंबा दिला मी केलेल्या विकास कामावर विश्वास ठेवला माझ्या पाठीवर शाब्बासकीची थाप देत मोठ्या उत्साहात माझे स्वागत केले त्यामुळे माझे मन भारावून गेले, यामुळे मला ऊर्जा मिळाली असून मी अधिक जोमाने शहर विकासासाठी काम करील अशी भावना आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

आमदार संग्राम जगताप यांनी शहरांमध्ये विकासाची कामे मार्गी लावली आहे, त्यामुळे माझा विकासकामांना पाठिंबा आहे. शिवसेनेचा शहरात उमेदवार नाही, त्यामुळे आम्ही हिंदुत्व विचाराचे असल्यामुळे महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांना विधानसभा निवडणुकीमध्ये पाठिंबा देत आहे. त्यांच्यामुळे शहर विकासाला गती प्राप्त झाले असून आपल्या शहर नक्कीच विकसित शहर म्हणून ओळखले जाईल असे गणेश कवडे यांनी सांगितले.

# गृहिणी

## आरोग्य

### स्मार्टफोनपासून असे करा संरक्षण

स्मार्टफोन तसंच डिजिटल उपकरणांमधला निळा प्रकाश डोळ्यांसाठी घातक असतो. त्याचे त्वचेवरही वाईट परिणाम होतात. लॅपटॉप, स्मार्टफोन, तसंच टीव्हीमधून बाहेर पडणारा निळा प्रकाश कोलाजेन, हिल्यूरॉनिक ॲसिड आणि इलास्टिनसाठी घातक असतो. स्मार्टफोनमधून बाहेर पडणाऱ्या निळ्या प्रकाशाचे त्वचेला असलेले धोके लक्षात घेता फोन वापरण्याआधीही चेहऱ्याला सनस्क्रीन लावून घ्यायला हवं. स्मार्टफोनच्या निळ्या प्रकाशातून अतीनील किरणं बाहेर पडतात. ती त्वचेसाठी तितकीच धोकादायक असतात.

## पाककला

### चंपाकळी

**साहित्य :** १ वाटी मैदा, मोहन, २ चमचे तेल किंवा तूप, १ वाटी साखर, तळण्यासाठी तेल

**कृती** – मैद्यात मोहन घालून थोडे घट्ट भिजवून ठेवावी अर्धा तास साखरेचा एकतारी पाक करून ठेवायचा, पाकात थोडा केशरी रंग घालायचा मैद्याच्या पुरी लाटून मध्ये कापायची केलेली पुरी दोन बाजूला धरुन उलट सुलट अलगद पीळ भरायचा नंतर मंद गॅसवर तळून घ्यावे आणि पाकात टाकावे ती चाफा कळी सारखी दिसते म्हणून या पदार्थाला चंपाकळी असे म्हणतात.

## वास्तू

### शेतजमीन संबंधी

शेतजमिनीचा तुकडा कोणत्याही परिस्थितीत बहुस्तरीय नसावा. हे प्लॉट योग्यरित्या समतल करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत, जर एखादी विशिष्ट शेतजमीन बहुस्तरीय असेल, तर जमिनीचा उतार उत्तरेकडे किंवा पूर्वेकडे तिरपा असावा. जर एखाद्या भूखंडाचा पश्चिम किंवा दक्षिणेकडे उतार असेल तर जमिनीच्या मालकाचा खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षा जास्त असेल. त्यामुळे त्याचा एकूण नफा शून्य होतो.

## सल्ला

शेतजमिनीसाठी वास्तूनुसार शेतमजुरांसाठी निवासस्थान किंवा झोपड्या पश्चिम किंवा दक्षिण–पश्चिम दिशेला बांधल्या पाहिजेत.

## सौंदर्य

ग्रीन टीमध्ये कॅटेचिन भरपूर प्रमाणात असते, जे चमकदार त्वचेसाठी सर्वोत्तम आहे. त्वचेचे संरक्षण आणि वृद्धत्वविरोधी फायदे देते. ग्रीन टी त्वचेला सूर्याच्या नुकसानीपासून वाचवण्यास मदत करते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४

**प्रबोधिनी एकादशी, पंढरपूर यात्रा, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, पू.भा.०७|५२, उ.भा.२९|४० सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मैदानी खेळात सहभागी व्हाल. अचानक जुने मित्र भेटतील.

**वृषभ** : स्पर्धात्मक परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाल. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल.

**मिथुन** : जोडीदाराला समजावून घ्याल. तुमचे व्यक्तिमत्त्व आज बहरेल. सहनशीलतेने कार्यरत राहाल.

**कर्क** : मानसिक ताण शक्य. कठोर बोलणे वा सहकाऱ्यांशी गैरवर्तणूक महागात पडेल.

**सिंह** : प्रिय व्यक्तीविषयी शंका घ्याल. आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील.

**कन्या** : आर्थिक गुंतवणुकीतून योग्य तो मोबदला मिळेल. नात्यामध्ये कटुता येईल. उधारी वसुल होईल.

**तूळ** : वाहने व उपकरणे जपून वापरावीत. जोडीदाराबरोबर रोमँटिक क्षण अनुभवाल. वैवाहिक आयुष्य बहरेल.

**वृश्चिक** : कार्यालयाच्या ठिकाणी रागावर नियंत्रण न ठेवल्यास नुकसान होईल.

**धनु** : शारीरिक व्यायाम अथवा योगाचे महत्त्व लक्षात घ्याल.

**मकर** : आरोग्य उत्तम राहील. सकारात्मक ऊर्जेने कार्यरत राहाल.

**कुंभ** : अनावश्यक गोष्टींचा विचार करणे धोकादायक ठरेल. मानसिक बळ वाढेल. नोकरीत अनुकूल स्थिती राहील.

**मीन** : कर्जाऊ रक्कम देणे टाळावे. व्यवसायात भागीदारी नुकसान दायक. वैवाहिक आयुष्यात थोडे निवांत क्षण अनुभवाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**अमेरिकन** – आमच्या देशात सगळे राईट साईडला गाडी चालवतात, तुमच्या देशामध्ये काय सिस्टम आहे?

**भारतीय** – तसा काही फिक्स नसत म्हणजे, समोरील व्यक्ती कोणत्या साईडने येत आहे, त्यावर ते अवलंबून असत!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* आवळ्यात कोणते जीवनसत्त्व असते? – क
* महाराष्ट्र पोलिस दलातील सर्वोच्च पद कोणते? – पोलिस महासंचालक
* नुकतेच महाराष्ट्र सरकारने कोणत्या गटातील आरक्षण घोषित केले आहे? – निराधार मुले
* हुजूरसाहेब गुरुद्वारा कोणत्या शहरात आहे? – नांदेड

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०४७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) बेताल; आवश्यकतेपेक्षा जास्त ४) खाण; आलय; साठा ७) ओढा; रोख; झोक ८) तपास करणारा ९) सजीव; चेतनायुक्त ११) अयोध्येचा राजा; सीतापती १२) माळ; हार (फटाक्यांचा वगैरे) १६) मुस्लीम साधू १७) अभिमान; ताठा १८) फुरसत; उसंत २०) सावध; सजग २२) आघात; घाव; जखम २३) सकाळनंतरचा उन्हाचा काळ २५) पलंग विणण्याची कापडी पट्टी २६) हरणाची एक जात

**उभे शब्द :-** १) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार २) विपुलता; समृद्धी; सुकाळ ३) पडणे; पात; नाश ४) एक जलदेवता; आश्रय ५) शत्रू; दुष्मन ६) गोडी; चव; स्वाद १०) तळमळ; तगमग १३) पांढरे चकचकीत; संगमरवरी १४) सगळे; सारे; समस्त; सकल १५) एक बिहारी आडनाव; एक केंद्रीय मंत्री रामविलास ++++ १७) दंग; मग्न; लीन; रममाण; रत; गुंग १९) रतीब; उकाडा २१) चंचल; क्षणिक; पातळ २४) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा

### शब्दगंध क्र. ७०४६ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : इतरांसाठी वेळ नसेल एवढं व्यस्त राहू नका आणि कुणीही गृहीत धरेल एवढे स्वस्त सुद्धा होऊ नका.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### पहिलं इंजिन आणि वाहन उद्योग कसा सुरू झाला?

सहसा हेनरी फोर्ड यांना वाहन उद्योगाचा जनक मानलं जातं. पण, पहिली गाडी त्यांनी बनवली होती का? फोर्ड यांचं खरं श्रेय गाड्यांचा पहिला कारखाना सुरू करण्याचं होतं. वाफेवर चालणारी अनेक इंजिन जेम्स वॉट यांच्या जन्मापूर्वीही कार्यरत होती. मग इंजिनच्या शोधाशी त्यांचं नाव का जोडलं जातं? एकदा त्यांच्याकडे एक न्यूकॉमन इंजिन दुरुस्तीसाठी आलं तेव्हा त्यांना जाणवलं की ते इंजिन किती ऊर्जा वाया घालवत होतं. मग त्यांनी त्यात दुरुस्ती करून त्याला अधिक कार्यक्षम बनवलं आणि १७६९ मध्ये त्याचं पेटंट मिळवलं.

कार्ल बेन्झ यांनी निकोलस ओटो यांच्या इंजिनच्या मदतीनं १८८६ साली एक स्वयंचलित वाहन तयार केलं. आणि त्यानंतर केवळ १५ वर्षांत लंडनच्या रस्त्यांवरचे घोडे गायब झाले.

हेनरी फोर्ड यांनी खरी क्रांती घडवली. जगाला गाड्यांच्या फॅक्टरीची कल्पना देऊन. असेंब्ली लाईनची कल्पना कारखान्यात राबवून त्यांनी चारचाकी गाडीचं स्वप्न सामान्यांच्या आवाक्यात आणलं. जगभरातल्या लोकांचा प्रवास यामुळे अधिक सोपा, आरामदायी आणि जलद झाला.

## चुकीचा सल्लागार

एक माणूस रस्त्याच्या कडेला समोसे विकायचा निरक्षर असल्याने त्यांनी वर्तमानपत्र वाचले नाही. श्रवणशक्ती कमी झाल्यामुळे तो रेडिओ ऐकू शकत नव्हता आणि त्याची दृष्टी कमी असल्यामुळे त्याने कधीही दूरदर्शन पाहिले नव्हते. असे असूनही तो भरपूर समोसे विकायचा. त्याची विक्री आणि नफा वाढतच गेला. त्याने अधिक बटाटे विकत घेण्यास सुरुवात केली, तसेच आधीच्या पेक्षा मोठा आणि चांगला स्टोव्ह विकत घेतला. त्यांचा व्यवसाय सातत्याने वाढत होता, म्हणूनच अलीकडे बी.ए.ए. पदवी मिळवलेला त्यांचा मुलगा वडिलांच्या मदतीला आला. त्यानंतर एक विचित्र घटना घडली. मुलाने त्या माणसाला विचारले,

''बाबा, आपल्याला माहित आहे का की आपल्याला खूप नैराश्य येणार आहे?''

वडिलांनी उत्तर दिले, ''नाही, पण मला त्याच्याबद्दल सांगा.''

मुलगा म्हणाला, ''आंतरराष्ट्रीय परिस्थिती खूप गंभीर आहे. देशांतर्गत परिस्थिती आणखी बिकट आहे. येणाऱ्या वाईट परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज व्हायला हवे.

मुलगा कॉलेजला गेला आहे, वर्तमानपत्र वाचतो, रेडिओ ऐकतो, त्यामुळे त्याचे मत हलके घेऊ नये, असे त्या माणसाला वाटले.

दुसऱ्या दिवसापासून त्याने बटाट्याची खरेदी कमी केली आणि त्याचा साईन बोर्ड उतरवला. त्याचा उत्साह संपला होता. लवकरच त्याच दुकानाला भेट देणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली आणि त्याची विक्री झपाट्याने कमी होऊ लागली. वडील मुलाला म्हणाले, ''तू बरोबर होतास. आपण मंदीच्या काळातून जात आहोत. मला आनंद झाला की तू मला वेळेपूर्वी चेतावणी दिलीस.''

तात्पर्य : सल्लागार काळजीपूर्वक निवडणे, परंतु आपल्या स्वतःच्या निर्णयावर कार्य करणे.



## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

### जीवन की रोशनी

एक आत्मिक स्तर पर उन्नतिशील मनुष्य जिसका सूक्ष्म तन शुद्ध हो चुका होता है, काम लोक में से बिना रुके गुज़र जाता है। सदाचारी और संयमी मनुष्य चाहे कम पढ़ा हुआ है परन्तु इस रास्ते पर शान्ति से स्वप्न में ही गुज़र जाता है। इससे भी कम उन्नति वाले लोग, उस मण्डल की चेतनता में जाग उठते हैं जैसे–जैसे वे अपने जीवन में काम करते रहे हाते हैं। जिनका पशुत्व अब भी उनके साथ लिपटा होता है और जिन्हें प्रेत कहा जाता है, अपने स्वभाव के अनुसार के अनुकूल देश में जाग उठते हैं।

यह लोक बड़ा भ्रम में डालने वाला और मयावी होता है। इसलिए पूरे गुरु द्वारा दीक्षित होने वाले जीवों को यहाँ ठहरने नहीं दिया जाता ताकि वे कहीं यहाँ ठगे न जायें। इसके विपरीत उनको ढाँप कर बड़ी

गति से इसमें से निकाल कर उच्चतम मण्डलों में ले जाया जाता है ताकि वह वहाँ आत्म प्रौढ़ता और स्थायीपन प्राप्त करके, बाद में बड़े विश्वास के साथ इस लोक की जादूमयी, लुभाने वाले और मायावी आकर्षण के सामने खड़े हो सकें और ऊपरी रूहानी मण्डलों की ओर जाते समय कहीं यहाँ रास्ते में ही न रुक जायें ख

इच्छाओं के इस सूक्ष्म लोक से गुज़र कर कुछ आत्माएँ, एक और विचार लोक में जा पहुँचती हैं। यह बुद्धि द्वारा रची हुई मनोमयी सृष्टि है। विचार बड़े शक्तिशाली होते हैं और हर मनुष्य अपने जीवन में अपनी कल्पना की उड़ानों द्वारा अपना एक स्वप्नों का संसार बनाता है और मृत्यु के बाद आत्मा धीरे–धीरे अपने इस काल्पनिक किलों के संसार में ले जाई जाती है।

मन अपने शुद्ध रूप ब्रह्म से लेकर व्यक्ति तक हर स्तर पर अपनी– अपनी दुनिया का ताना बाना बुनता है और एक मकड़ी की तरह इसी में रहना पसंद करता है और अपने ही अंदर के निकले हुए बड़ी कलाकारी से बुने हुए एक बारीक जाल में इधर–उधर, ऊपर–नीचे फिरते रहने में खुशी अनुभव करता है, इसी तरह ही मनुष्य के विचारों का ढांचा और प्रतिबिम्ब, स्थूल संसार रूपी कैदखाना छोड़ने से बहुत समय पहले ही एक बड़े विचित्र विचार संसार के रूप में तैयार हो चुका होता है।

'तुम जो सोचते हो, वह बन जाते हो', यह प्रकृति का नियम है और कोई भी इसकी कार्य विधि से बच नहीं सकता। इस विचार संसार में, केवल विचारों की लहरें ही आत्माओं के बीच आदान–प्रदान का साधन हैं और सभी आत्माएं एक दूसरी के निकट सम्पर्क में रहती हैं। यहाँ समय और स्थान का कोई महत्व नहीं। ये अगर एक दूसरे से कभी दूर जाती भी हैं तो केवल सहानुभूति की कमी के कारण। यहाँ का जीवन इससे पहले के लोकों से अधिक अमीर, पूर्ण तथा उन्नतिशील परन्तु मायावी होता है क्योंकि यह हर एक के मन मसाले की पैदावार होता है और कोई भी माया के प्रभाव से बच नहीं सकता। यहाँ हर कोई

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

यह याद रखता है उस से संबन्धित आवश्यक कार्य भी करता रहता है। हमें कोई शादी का निमन्त्रण मिलता है। हम शादी पर गिफ्ट्स आदि की तैयारी भी करते रहते हैं और निर्धारित तिथि को पहुंच भी जाते हैं। हमें किसी से मिलना हो तो उस से समय लेते हैं और दी गई। तिथि और समय पर हम पहुंच जाते हैं और जिस समस्या को लेकर मिलने गये है उसकी तैयारी भी कर के जाते हैं। हमें तीर्थ यात्रा पर जाना हो तो तिथि निर्धरित होने के बाद हम आवश्यक तैयारी करते रहते हैं और समय पर पहुंच जते हैं। यह मन का स्वभाविक गुण है। हम जो कुछ चाहते हैं उसके बारे पहले सोचते हैं। फिर उस को धरातल पर ले आते हैं। विज्ञानिक खोजें भी इसी आधार पर होती हैं। कोई समस्या आती है। उसका हल सोचने लग जाते हैं और कोई आविष्कार हो जाता है।

प्रत्येक व्यक्ति की स्थूल समस्याओ का हल करने के लिये भी दिमाग का यही गुण काम आता है। अगर हम समय बचाना चाहते हैं। तो मन के सूक्ष्म विचारों को जीतने के लिये भी मन को इन्हें हल करने पर लगाना चाहिए। अगर सुबह नहीं उठ पाते हैं तो मन में कहते रहो मैं कल सुबह से ४ बजे जरूर उठूंगा।

मन को याद रहेगा और आप उठ जाएंगे। जैसे चंडीगढ़ जाना हो तो उठ जाते है। अगर नहीं उठ सके तो जब भी उठो, उठते ही कहना है कल जरूर उठूंगा। ऐसे हर रोज कहना है जब तक कि आप का उठने का रोटीन न बन जाए। हां उठने से संबन्धित चीजो पर भी सोचते रहो। जैसे समय पर सोना और हल्का भोजन करना आदि। सुबह उठते ही सोचो मैं आज के काम आज ही खत्म करूगां। ऐसे ही दिन में भी कई बार कहते रहो। हर रोज के काम हर रोज करूगा। आप के दिमाग को आदत पड़ जाएगी। आप कभी कोई काम पेन्डिंग नहीं छोड़ेंगे। गुस्से से छुटकारा पाना चाहते हैं तो यह सोचो जब भी कोई व्यक्ति मेरे से गुस्सा करने लगेगा तो मुझे शांति और स्नेह के विचार चलने लग जाएंगे। आप का दिमाग यह याद रखेगा और समय आने पर आप के अंदर शांति के विचार आएंगे। आप को अगर किसी खास व्यक्ति को देखने पर गुस्सा आता है तो दिन में एक बार मन में कहो मुझे जब भी विरोधी दिखेगा मेरे मन में शांति के विचार चलेंगे। कुछ दिनो बाद ऐसा ही होने लगेगा। आप मन में दिन में एक दो बार सोचो मैं जिस के भी संपर्क में आऊँगा उसे शांति मिलने लगेगी। कुछ दिनों बाद ऐसे ही होने लगेगा। किसी व्यक्ति से खास अनबन है तो हर रोज सोचना है अगस्त २०२१ (या कोई और तारीख) तक हमारी फिर से बन जाएगी हम मिल जुल कर चलेंगे। मान लो किन्हीं कारणों से ऐसा नहीं होता तो डेट को आगे बढ़ाते रहो। ऐसे करते रहने से एक दिन सच मुच आप की बन जाएगी। किसी व्यक्ति ने भूतकाल में आप से बुरे व्यवहार किये है। उसकी याद आते ही या उसे देखते ही हमें वही व्यवहार याद आने लगता है और गुस्सा आता है। ऐसे व्यक्तियों के लिये मन में कहो अब जब भी वह याद आएगा या वह दिखेगा मेरे मन में उसके प्रति अच्छे विचार उठेंगे या फलानी होने लगेगा। ऐसे ही डेट से अच्छे विचार उठेंगे तो सचमुच ऐसे भगवान या ईष्ट को याद करने के बाद कहें, एक जनवरी २०२२ तक विश्व में शांति हो जाएगी। अगर न हो तो डेट आगे बाढाते रहो। एक दिन सचमुच में इस दूनिया में स्वर्ग आ जाएगा। ऐसा इस लिये होता है क्योंकि हम जो भी संकल्प करते हैं हमारे शरीर की कोशिकाए उस कार्य को करने लग जाती हैं और निर्धारित तिथि तक कर देती हैं। समय प्रबन्धन और पार्किंसन का नियम (४) रोगो का उपचार

आज प्रत्येक मनुष्य किसी न किसी रोग से पीड़ित है। शरीर में एक सिस्टम है जो शरीर का इलाज करता है। दवाइयां तो सिर्फ शरीर

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भाच्या मासानुमासिक वाढीसाठी उपयुक्त आयुर्वेदिक उपचार

**१) पहिला महिना :** पहिल्या महिन्यामध्ये पुरुषबीज व स्त्रीबीज यांचा संयोग होऊन त्यात जीवात्म्याचा प्रवेश होतो. या काळामध्ये खालील औषधे उपयुक्त ठरतात.

**१) यष्टिमधु** – म्हणजेच ज्येष्ठमध. हे आपल्या शरीरामध्ये विषद्रव्याची निर्मिती होऊ देत नाही.

**२) लताकरंज (सागबीज)** – हे गर्भस्थापना करण्यास मूदत करते.

**३) देवदारू** – गर्भस्थापनेमधील अडचणींना प्रतिबंध करते.

**२) दुसरा महिना :** या महिन्यामध्ये गर्भ हा घन स्वरूपात असतो.

**१) अश्मांतक** – हे गर्भवतीच्या शरीरातील दूषित घटक काढून टाकते. २) मंजिष्ठा – मंजिष्ठा हे गर्भिणीचे रक्तशुध्दी करण्याचे काम करते. ३) शतावरी – गर्भिणीच्या शरीरास पोषक असणारे घटक शतावरीतून मिळतात; त्यामुळे गर्भपात होण्याचा धोका टळतो.

**३) तिसरा महिना :** या महिन्यामध्ये गर्भाचे अवयव तयार व्हायला लागतात.

**१) क्षीरकाकोली :** गर्भिणी व गर्भ या दोघांमध्ये रस रक्तपुरवठा व्यवस्थित होण्यासाठी क्षीरकाकोली उपयुक्त ठरते.

**श्वेत व कृष्णसारिवा :** यामुळे गर्भाची वाढ चांगल्या रीतीने होऊन गर्भपात होत नाही. तसेच गर्भाची वार (Placenta) देखील मजबूत तयार होते; त्यामुळे वार गर्भाशयाच्या भिंतीपासून सुटून जो गर्भपात होतो, तो होत नाही.

**४) चौथा महिना :** या महिन्यामध्ये गर्भाचे अवयव स्पष्ट दिसू लागतात. तसेच गर्भाचे स्रोतसे दिसतात.

**१) सारिवा :** यामुळे गर्भाची स्रोतसे चांगली तयार होण्यास मदत होते. २) यष्टीमधु : ज्येष्ठमध गर्भवतीला व गर्भाला पोषक व बल्य असते.

३) मंजिष्ठा : गर्भाची त्वचा निरोगी, कांतीयुक्त तयार होण्यास मदत होते.

**४) धमासा :** बाळाचे स्पंदन सुरू होण्यास आणि उद्युक्त करण्यास मदत करते.

**५) पाचवा महिना :** गर्भाचे अवयव अधिक स्पष्टपणे दिसू लागतात. यामध्ये गर्भाचे सर्व स्रोतसे तयार झालेले असतात.

**१) रिंगणी व डोरली :** गभभिोवती असणारे गर्भादक योग्य प्रमाणात राहण्यास मदत करते.

**२) वटांकुर व वटसाल :** गर्भपात होऊ नये म्हणून उपयोगी पडते. ६) सहावा महिना : या महिन्यामध्ये गर्भ मन व बुद्धीने तयार होतो.

**१) पिठवण :** गर्भाची, मेंदची व बुध्दीची वाढ चांगली होते.

**२) गोक्षुर :** गर्भाचे स्नायू, हाडे मजबूत करण्यासाठी मदत होते.

**(क्रमशः)**

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन आयोजित ऑल इंडिया ओपन चेस टुर्नामेंट स्पर्धेचा विजेता ठाणे येथील विक्रमादित्य कुलकर्णी तर उपविजेता मुंबईचा श्रेयन मुजुमदार

नगर – शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन आयोजित अहिल्यानगर जिल्हा बुध्दीबळ संघटनेच्या वतीने तसेच जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या सहकार्यातून ६ ते १० नोव्हेंबर या कालावधीत सप्तक सदन मंगल कार्यालय खिस्त गल्ली येथे ऑल इंडिया ओपन चेस टूर्नामेंट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे विजेत्यांना जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत लवकरच जिल्ह्यातील स्कुल चेस लिगचे आयोजन करण्यात येईल. ज्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत बुद्धिबळ खेळण्याची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊन शाळेतील विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट बुद्धिबळ खेळाडू तयार होतील.

या स्पर्धेला महाराष्ट्रसह अनेक राज्यांतील खेळाडूं सहभागी होऊन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या स्पर्धेत १३५ आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडू सहभागी झाले होते. हि स्पर्धेच्या दृष्टीने अतिशय अभिमानास्पद बाब असून त्यामुळे या स्पर्धेचा दर्जा उच्च स्तरावर पोहचला आहे. जिल्ह्यातील अनेक बुद्धिबळ खेळाडू घडविण्यासाठी वेळोवेळी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

बुद्धिबळ हा खेळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत वाढविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रयत्न केले जातील. बुद्धिबळ खेळाचा प्रचार व प्रसार वाढविण्यासाठी संघटनेच्या वतीने अखंड प्रयत्न चालू राहतील. व लवकरच जिल्ह्यातील बुद्धिबळ खेळाडूंसाठी तज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षण देण्याचे नियोजन सुरु आहे. या स्पर्धेत अनेक नामांकित खेळाडू सहभागी होऊन त्यांनी आपला उत्कृष्ट खेळ केला असल्याची भावना व्यक्त केली. या स्पर्धेतील पंचाचा सत्कार करण्यात आला.

या स्पर्धेत पंच म्हणून शार्दुल तापसे सातारा, पवन राठी पुणे, अमरिश जोशी, विलास राजपूत छत्रपती संभाजीनगर, देवेंद्र ढोकळे, रोहित आडकर, सौ. अनुराधा बापट, सौ. रोहिणी आडकर काम पहात होते. हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सचिव यशवंत बापट सर, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त पारुनाथ ढोकळे सर, शाम कांबळे, प्रकाश गुजराथी सर, सुनील गुगळे, सुनील जोशी, विष्णू कुद्रे, संजय खडके, चेतन कड, नवनीत कोठारी, विशाल गुजराथी, मनिष जसवानी, दत्ता घाडगे, स्वप्नील भगुरकर आदीसह खेळाडू व पालक उपस्थित होते. प्रास्ताविक सचिव यशवंत बापट सर यांनी केले व सुत्रसंचलन पारुनाथ ढोकळे सर यानी केले तर आभार प्रदर्शन खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी मानले.



शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशन आयोजित ऑल इंडिया ओपर चेस टुर्नामेंट स्पर्धेतील विजेते खेळाडू. समवेत अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, इतर पदाधिकारी.

निकाल पुढीलप्रमाणे – प्रथम–ठाणे विक्रमादित्य कुलकर्णी, द्वितीय–मुंबई श्रेयान मुजुमदार, तृतीय–ओरिसा स्वैन आशीर्वाद, चतुर्थ–संभाजीनगर इंद्रजीत महिंद्रकर, पाचवे–प्रणव जाधवर, सहावे– कोल्हापूर श्रीराज भोसले, सातवे–पुणे होम लमखेन, आठवे–सातारा अपूर्व देशमुख, नववे–आयान सोमानी, दहावे–स्पंदन वाहने, अकरावे–ध्रुव पाटील, बारावे–अभिषेक पाटील, तेरावे–सार्थक भापकर, चौदावे–चक्रवर्ती आर्यन, पंधरावे–अरिन कुलकर्णी.

**बेस्ट रेटिंग १६०० :** प्रथम–राघव वावडे, द्वितीय–अमेय चौधरी, तृतीय–सुनील जोशी, चतुर्थ–वरद लिमकर, पाचवे–धवल लोंढे, सहावे–मिषीन शर्मा, सातवे–अभिजय वालवेकर, आठवे–श्रेयस पाटील, नववे–दिव पटेल.

**बेस्ट रेटिंग १५०० :** प्रथम–अतिश अहिरे, द्वितीय–अभिजात वाबळे, तृतीय–नैतिक माने, चतुर्थ–कौस्तुभ वाघ, पाचवे–शुभम घनवट, सहावे–वरद गोविंदकर, सातवे–वेदांत कुबडे, आठवे–अथर्व भारसाकले, नववे–बग्गा गुरजस.

**बेस्ट अनरेटेड :** प्रथम–ध्रुव वाकचौरे, द्वितीय–ऋतुराज पांचाल, तृतीय–रवथू नायडू, चतुर्थ–राजवीर शिंदे, पाचवे–चैतन्य मोरे, सहावे–आनंद कुलकर्णी, सातवे–आदित्य पवार, आठवे–आर्यन सोनवणे, नववे–अजिंक्य कंदरकर.

**बेस्ट ६० वयस्कर खेळाडू :** प्रथम–देवेंद्र चंचल, दुतीय–दीपक ढेपे, तृतीय–मिलिंद पारले, चतुर्थ–अमरजीत बग्गा, पाचवे–त्रिंबक तोफखानेवाले, सहावे–सुनील गोखले, सातवे–सुरेंद्र चांडोले, आठवे–बलभीम कांबळे, नववे–सुरेंद्र सरदार.

**बेस्ट महिला :** प्रथम–अनवी उडपी, द्वितीय–श्रावणी नानकर, तृतीय–समृद्धी पाटील, चतुर्थ–अर्चना सोनवणे, पाचवे–शर्वरी देशमुख, सहावे–सानवी गोरे, सातवे–गहेना शिंगवी, आठवे–श्रुती काबरा, नववे–अनया उलभगत.

**बेस्ट नगर खेळाडू :** प्रथम–आशिष चौधरी, द्वितीय–आयुष अय्या, तृतीय–प्रज्वल आव्हाड, चतुर्थ–श्रीराज इंगळे, पाचवे–स्वराज काळे, सहावे–अजय महामुनी, सातवे–जिनाम संकलेचा, आठवे–मोहित गांधी, नववे–सार्थक शिंदे.

**बेस्ट ११ वर्षाखालील :** प्रथम–कावीस लिमये, द्वितीय–प्रसाद क्षितिज, तृतीय–श्रेयस नलावडे, चतुर्थ–ऋग्वेद पोद्दार, पाचवे–स्वराज शंकर, सहावे–रियांश द्विवेदी, सातवे–विहान देशमुख, आठवे–प्रशांत वर्धन, नववे–मितेश गडहरी.

**बेस्ट ९ वर्षाखालील :** प्रथम–वरद पाटील, द्वितीय–ऋषिकेश राठोड, तृतीय–शौर्य भोंडवे, चतुर्थ–सर्वज्ञ बालगुडे, पाचवे–गोरंश खंडेलवाल, सहावे–रिधान अग्रवाल, सातवे–अन्वित गायकवाड, आठवे–अभेद्य डायमा, नववे–ईशान लड्डा.

**बेस्ट ७ वर्षाखालील :** प्रथम–अनिश जवळकर, द्वितीय–कबीर दळवी, तृतीय–शाश्वत देशमुख, चतुर्थ–राहुल धवल, पाचवे–शर्विल भगूरकर, सहावे–सुघोष कंकाल, सातवे–अद्विक ठोंबरे, आठवे–मृगांक पाटील, नववे–श्रीका महाजन.

# शहरातील सर्वांनी निर्भय होऊन मतदानाचा हक्क बजावावा

### हेल्पिंग हँड्स फॉर हंगर्स ग्रुपतर्फे मतदान जनजागृतीचा सामाजिक उपक्रम

नगर – शहरातील मतदान टक्केवारी वाढावी आणि सर्वांनी निर्भय होऊन मतदानाचा हक्क बजावावा,असे आवाहन तसेच सेल्फी स्टॅन्डचे औपचारिक उद्घाटन अहिल्यानगर येथील प्रेमदान चौकातील हेल्पिंग हॅण्डस फॉर हंगर्स ग्रुपच्या वतीने करण्यात आले.




हेल्पिंग हॅण्डस् फॉर हंगर्स ग्रुपतर्फे मतदान जनजागृतीच्या सामाजिक उपक्रमाचे फित कापून सुरुवात करताना निवडणूक विशेष कार्यकारी अधिकारी शहाबुद्दीन तडवी, संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब उर्फ नाना भोर आदी.

१० नोव्हेंबर रोजी या कार्यक्रमास निवडणूक विशेष कार्यकारी दंडाधिकारी शहाबुद्दीन तडवी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री. तडवी व संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब उर्फ नाना भोरे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आली.

श्री. तडवी यांनी नगर शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे, मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी संस्था करत असलेल्या उपक्रमाबद्दल संस्थेचे विशेष कौतुक केले आणि संस्थेला भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हेल्पिंग हॅण्डस परिवार गत पाच वर्षांपासून दररोज सकाळी १० ते २ या वेळेत अल्प दरामध्ये सर्वांसाठी भोजन सेवा देत आहे. आजूबाजूला असलेल्या परिसरातील हॉस्पिटल मधील पेशंट, पेशंटचे नातेवाईक तसेच समाजातील गरजू लोक आणि ज्याला भूक लागेल, ते सर्व संस्थेमध्ये येऊन सेवेचा लाभ घेतात.

याशिवाय संस्था वर्षभर अनेक सामाजिक उपक्रम राबवत असते. त्यामध्ये रक्तदान शिबिर, समाज प्रबोधन, अवयव दान, नेत्रदान असे उपक्रम राबवत असते.

मतदानजनजागृतीअभियान राबवण्यासाठी नंदेश शिंदे, नवीन बजाज, दिलीप गाडेकर, मनोज गुजराथी, अशोक साळुंखे, अविनाश मुंडके, शंकर पवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मानव सेवा प्रकल्पाचे अंबादास गुंजाळ, त्यांचे सहकारी, सूर्यकांत सैंदाणे व परिसरातील नागरिक उपस्थित होते. संस्थेचे सदस्य संजय खोंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# निवडणुका पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी प्रशासनाला सहकार्य करावे

### सिद्धाराम सालीमठ यांचे आवाहन

नगर – विधानसभा निवडणूक प्रक्रिया राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी नीटपणे समजावून घेणे गरजेचे असून निवडणुका पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, ईव्हीएम समन्वयक शारदा जाधव आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, रविवारपासून मतदान यंत्रावर उमेदवारांचे चिन्ह टाकण्यास सुरुवात होईल. त्यानंतर मतदान यंत्र सीलबंद करून स्टाँगरुममध्ये ठेवण्यात येतील. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँगरुम १९ नोव्हेंबर रोजी उघडून मतदान यंत्र मतदान केंद्र पथकांना देण्यात येतील. मतदानाच्यादिवशी अभिरूप मतदन झाल्यावर प्रत्यक्ष मतदानास सुरूवात होईल. ही संपूर्ण सर्वसमावेशक आणि पारदर्शक असावी यासाठी राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक आहे. राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या प्रतिनिधींनी प्रत्येकवेळी प्रक्रियेवर लक्ष ठेवावे आणि काही शंका असल्यास वेळीच संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घ्यावी. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया मुक्तपणे आणि पारदर्शकपणे पार पाडण्याचे प्रशासनाचे प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

श्रीमती जाधव यांनी मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेतील विविध टप्प्यांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.



निवडणूका शांततेत पार पाडण्याचे आवाहन करताना विशेष पोलिस निवडणूक निरीक्षक दीपक मिश्रा. समवेत जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला आदी.

# विधानसभा निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी कर्तव्यभावनेने काम करा

### विशेष पोलीस निवडणूक निरीक्षक दीपक मिश्रा यांच्या सूचना

नगर – विधानसभा सार्वत्रिक निवडणुका शांततेत आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस दलाने देशाच्या प्रति पवित्र कर्तव्य करण्याच्या भावनेने जबाबदारी पार पाडावी, अशी सूचना विशेष पोलीस निवडणूक निरीक्षक दीपक मिश्रा यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील आदी उपस्थित होते.

श्री. मिश्रा म्हणाले, आचारसंहिता अंमलबजावणीसाठी सिव्हिजील ॲपचे महत्व लक्षात घेता याबाबत नागरिकांना माहिती देण्यात यावी. निवडणुकीत कायदा सुव्यवस्थेबाबत गांभीर्याने नियोजन करावे. त्यासाठी सुरक्षा व्यवस्थेचे स्तर निश्चित करून प्रत्येक स्तरासाठी प्रतिसाद देण्यासाठी कालावधी निश्चित करावा. मतदानापूर्वी एक दिवस सुरक्षा व्यवस्थेबाबत आढावा घ्यावा. वृद्ध मतदारांना सुलभ मतदान करता यावे यासाठी व्हीलचेअरसारख्या आवश्यक सुविधा द्याव्या. मतदान केंद्रावर भ्रमणध्वनी नेण्यास प्रतिबंध करावा, अशा सूचना त्यांनी केल्या. त्यांनी निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनातर्फे करण्यात येत असलेल्या उपाययोजनांबाबत समाधान व्यक्त केले. जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील निवडणूक तयारीची माहिती दिली. पोलीस अधीक्षक ओला यांनी जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेची माहिती दिली. आतापर्यंत विविध प्रकरणात १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध मद्य, पैसे, सोने आदी २९ कोटी ७३ लाखाचा मुद्देमाल पकडण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. बैठकीला वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# विधान मंडप म्हणजे मतदार जनजागृतीतला इतिहास

### निवडणूक निरीक्षक ताई के यांचे प्रतिपादन; जिल्हाधिकारी कार्यालयात भारतातील सर्वात मोठा स्वीप कक्ष पाहण्यासाठी नागरिकांना आवाहन

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदान निवडणूक प्रक्रिया निरंतर चालू आहेत. लोकशाहीचे महत्त्व वारंवार अधोरेखित करण्यासाठी स्वीप सारखा उपक्रम फार महत्त्वाचा आहे. अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीचा विधान मंडप हा कक्ष मतदार जनजागृतीतील इतिहास ठरू शकतो, असे प्रतिपादन ताई के (निवडणूक निरीक्षक –सामान्य) यांनी केले.

या कक्षाच्या निरीक्षणाप्रसंगी ताई के यांनी मतदार जनजागृतीच्या खेळांचा आनंद घेतला. त्यावेळी ते बोलत होते. सिद्धाराम सालीमठ (जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अहिल्यानगर) यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आवारात स्वीप समितीच्या वतीने मतदार जनजागृतीच्या शेकडो संकल्पना असलेला सुमारे ६००० स्क्वेअर फुटांचा स्वीप कक्ष उभारण्यात आलेला आहे.




जिल्हाधिकारी कार्यालयात भारतातील सर्वात मोठा स्वीप कक्षाची नागरिकांनी पाहणी करावी असे आवाहन निवडणूक निरीक्षक ताई के यांनी केले. समवेत जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी.

यावेळी निवडणूक निरीक्षक हौलीनलाल गौईटे, अरुण कुमार, डी. रथ्ना, कविथा रामू, श्रीमती रंजीता, नागेंद्र नाथ त्रिपाठी, आशिष येरेकर (मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद), राहुल पाटील (उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी), अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) आदींनी विधान मंडपात स्वागत असा फलक हातात धरून नागरिकांना विधान मंडप पाहण्याचे आवाहन केले.

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र यांचे विविध जनजागृतीपर पोस्टर्स, मतदान प्रक्रिया साध्या सोप्या सुलभ पद्धतीने दाखवणारे मुलांसाठीचे मनोरंजक खेळ, माझी सही– माझी लोकशाहीचा१००% मतदानाची सही असलेला उपक्रम, बाराखडीतून लोकशाही शिक्षण, अहमदनगर जिल्हा स्वीप समितीचे विविध उपक्रम, मी महाराष्ट्र आहे– वैशिष्ट्यपूर्ण सेल्फी पॉईंट्स, क्यू आर कोड वॉल, व्ही आर बॉक्सरचना, व्हीव्हीपॅट मशीन विषयक साक्षरता, मतदानाची नोटा पद्धत, भारतातील पहिला स्वीप केअर व्हॉट्सअप क्रमांक, आमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करण्यासाठी चित्रकला स्पर्धेतील पोस्टर्स, मतदार मार्गदर्शिका, राष्ट्रीय व राज्य सदिच्छा दूत यांचे संदेश, विविध ॲपची माहिती, मतदान प्रक्रियेतील घटकांच्या चिकाटी व गुणवत्तेचे प्रतीक असलेली एकी नावाची मुंगी, सिनेमा व मालिकेतील गाजलेले संवाद व प्रसंगांवर आधारित मतदार जनजागृतीचे पोस्टर्स, भारत निवडणूक आयोगाची ऑनलाइन शपथ घ्या व प्रमाणपत्र मिळवा उपक्रम, मतदानासाठी ग्राह्य असणारी ओळखपत्रे व पुरावा, मतदानाच्या पायऱ्या दर्शवणारा स्थापू खेळ, नैतिक मतदानाचा सापशिडीचा खेळ, मतदान प्रक्रियेतील विविध अर्ज शोधण्याचा भुलभुलय्या खेळ, मतदान वर्णमालेचा तंबोला खेळ, चालत सहज सुलभ मतदान पद्धती खेळ आदी विविध महत्त्वपूर्ण उपक्रम या कक्षामध्ये आहेत.

विविध शासकीय कामानिमित्ताने जिल्हाभरातील व बाहेरील नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देत असतात.जिल्ह्याचे मुख्यालय असलेले या इमारतीत हा कक्ष स्थापन होताना नागरिकांचे प्रबोधन व्हावे असा स्वीप समितीचा मानस आहे. १० डिसेंबर २०२४ पर्यंत स. १० ते संध्या.६ या वेळेत हा कक्ष सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला असून शिक्षक, पालक यांनी आपल्या मुलांसह या कक्षाला भेट द्यावी, खेळ खेळावेत व लोकशाही प्रक्रियेची माहिती घ्यावी. असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी केले आहे.

# विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा 'महाराष्ट्रनामा' कार्यकर्ते घराघरात पोहोचवणार

### काँग्रेस जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांचा विश्वास

नगर – या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा घरापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्ते काम करतील असा विश्वास काँग्रेस जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी व्यक्त केला.

मुंबईत हा जाहीरनामा प्रसिद्ध होताना नगरमधील हॉटेल यश ग्रँड येथे महाविकास आघाडीच्या सर्वपक्षीय नेते मंडळींनी हजेरी लावून या जाहीरनाम्याचे थेट प्रक्षेपण मोठ्या स्क्रीनवर पाहिले. त्यावेळी वाघ बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते दादाभाऊ कळमकर, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाध्यक्ष प्राध्यापक शशिकांत गाडे, काँग्रेस नेते घनश्याम शेलार, माजी महापौर भगवान फुलसौंदर, शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संजय झिंजे, काँग्रेस शहर प्रमुख किरण काळे, बाळासाहेब भंडारी, मोहसीन शेख, इमरान बागवान, नईम सरदार आदी उपस्थित होते.



जाहीरनामा प्रसिद्ध होत असताना त्यांच्या कॉपीचे अनावरण हॉटेल यश ग्रँड येथे करताना महाविकास आघाडीचे पदाधिकारी.

महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांची भूमिका विशद करणारा आणि विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आगामी शंभर दिवसांचा एक्शन प्लान असलेला महाविकास आघाडीचा महाराष्ट्रनामा हा अधिकृत जाहीरनामा मुंबई येथे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पत्रकार परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला.

या जाहीरनामा प्रसिद्धी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण हॉटेल यश ग्रँड येथे करण्यात आले. यावेळी नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यात तीन पक्षांच्या कुबड्या घेऊन अस्तित्वात आलेले महायुतीचे घटनाबाह्य सरकार जनतेची दिशाभूल करत आहे. फसव्या योजना जनतेच्या माथी मारत आहे.

२०१४ पासून महाराष्ट्राची कशी फसवणूक होते आहे याची माहिती या महाराष्ट्र नामामध्ये देण्यात आली आहे.

पेट्रोल, गॅस सिलेंडरचे दर कशा पद्धतीने वाढले. लखपती कुटुंब करण्याची खोटी आश्वासने दिली जात आहेत. यामुळे सरकारी तिजोरीवर विलक्षण बोजा पडला आहे. तो भरून काढण्यासाठी त्या नावाखाली कशाप्रकारे वारे माप टॅक्स जनतेकडून वसूल केला जातो आहे. पेट्रोल वर १८% जीएसटी असताना आणि शेतीमालासह किरकोळ उत्पादनांवर १२ ते २८ टक्के जीएसटी लादला आहे. पण फाईव्ह स्टार हॉटेल, विमान प्रवास, हेलिकॉप्टरचा प्रवास तसेच हिऱ्यांवर अवघा पाच टक्के जीएसटी कसा आकारला जातो असा सवाल यात विचारण्यात आला आहे. गोर गरिबांना वारेमाप जीएसटी आणि श्रीमंत धनदांडग्यांना त्यात सवलती हा कुठला न्याय आहे. त्यामुळे या निवडणुकीत लोकसभा निवडणुकीप्रमाणे महाविकास आघाडीला चांगले वातावरण असून जनता महायुतीच्या भूलथापांना बळी पडणार नाही आणि त्यांना माफ देखील करणार नाही असे यावेळी सांगण्यात आले.

# मौलाना अबुल कलाम आझाद
# एक आदर्श व्यक्तीमत्व



मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म मक्का येथे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी झाला. त्यांचे मुळ नाव अबुल कलाम अहमद मुहीयोद्दीन आझाद. त्यांच्या वडिलांचे नाव मौलाना मुहम्मद खैरुद्दीन होते व आईचे नाव आलिया बेगम होते. १८९५ मध्ये मौलाना मुहम्मद खैरुद्दीन यांचे शिष्य हाजी अब्दुल वहिद यांच्या आग्रहामुळे ते भारतातील कलकत्ता येथे आले. हाजी अब्दुल वाहिद यांनी मौलाना मुहम्मद खैरुद्दीन यांना विनंती केली व मौलाना मुहम्मद खैरुद्दीन कलकत्ता येथे कायमचे रहिवाशी झाले. मौलाना अबुल कलाम आझाद यांची आई त्यांच्या वयाच्या तिसर्या वर्षीच मृत्यू पावली.

अरबी ही त्यांची मातृभाषा होती. उर्दू व फारशी या भाषेचे शिक्षण त्यांनी वडिलांकडून घेतले. वयाच्या १६ व्या वर्षी मौलाना आझाद यांनी १९०४ मध्ये 'दरसे निझामांचा' अभ्याक्रम पूर्ण केला. वयाच्या १२ व्या वर्षांपासून त्यांनी लेखनास सुरुवात केली. १९०२ मध्ये त्यांचे पहिले पुस्तके 'ऐलानुल्हक' प्रकाशित झाले. त्याच वर्षी त्यांनी 'लिसानूस सिद्दीक' या नावाचे मासिक काढले. लाहोरच्या 'अंजुमान-इ-हिमायत-इ-इस्लाम' या संस्थेने १९०४ मध्ये 'धर्माचा विवेकनिष्ठ आधार' या विषयावर मौलाना आझाद यांनी व्याख्यान दिले. त्यानंतर १९०५ साली 'अल नदवा' नावाचे लखनौ येथे निघणार्या नियतकालिकाचे संपादक झाले. १९०६ साली अमृतसर येथून निघणार्या 'वकिल' या पत्रिकेचे संपादक म्हणून काम केले.

लहानपणापासूनच मौलाना आझादांना शेरोशायरी, मुशार्याची आवड होती. 'नारंगे आलम' (रंगबिरंगी दुनिया) या नावाच्या मासिकाचे ते संपादक म्हणून काम करत. त्या मासिकात 'आझाद' या टोपण नावाने त्यांनी काव्य लेखन करीत असत.

१९०६ मध्ये मक्का येथील मुल्ला-मौलवींनी त्यांचा सत्कार केला. त्यावेळी त्यांनी 'अबुल कलम' म्हणजेच 'विद्या वाचस्पती' ही पदवी मिळाली. येथूनच त्यांचे मूळ नाव 'मोहियुद्दीन अहमद उर्फ फिरोजबख्त' हे बदलून 'अबुल कलाम आझाद' या नावाने ओळखले जावू लागले.

१९०५ ते १९०७ मध्ये कैरो येथील 'अल अझट' विद्यापीठात त्यांनी अरेबीकचे उच्च शिक्षण घेतले. १९०४ मध्ये त्यांना 'अलीम' चे प्रमाणपत्र मिळाले. मौलाना आझादांच्या मनावर सर सय्यद अहमद खान यांच्या विचारांचा प्रभाव झाला. त्यांनी १९०९ नंतर घरीच इंग्रजी भाषेच्या शिक्षणास सुरुवात केली.

राजकीय विचार-आधुनिक शिक्षण, विज्ञान व तत्वज्ञान यांचा अभ्यास प्रत्येकाने केला पाहिजे. आधुनिक काळात आवश्यक आहे. त्याशिवाय व्यक्ती सुशिक्षित होवू शकत नाही. सर सय्यद अहमदखान यांचा हा विचार त्यांनी स्विकारला. त्यांच्या वडिलांकडे सर्व धर्माचे - जातीचे लोक येत असत. त्यांच्या गुणांची व विनम्र वृत्तीची सर्व लोकांना माहिती होती. बंगालच्या फाळणीच्या वेळी भारतीय मुस्लिमांनी ब्रिटिशांच्या मानसिक व राजकीय गुलामगिरीतून सुटका व्हावी हा त्यांच्या राजकीय विचाराचा आधार होता.

त्यांनी 'तर्जुमानुल कुराण' म्हणजेच कुराणावरील भाष्य लिहिले, त्याचा पहिला भाग १९३१ मध्ये व दुसरा भाग १९३६ मध्ये प्रसिद्ध झाला. १९१० मध्ये राजकारणाची सुरुवात केली. राजकीय कार्य - १९१२ मध्ये मौलाना आझादांनी 'अल हिलाल' साप्ताहिक सुरु केले. त्यांच्या राजकीय जीवनाची ही सुरुवात होती. त्यातील राजकीय विचार ब्रिटीश शासनास प्रक्षोभक वाटले. 'अल हिलाल' या साप्ताहिकावर सरकारने बंदी घातली. त्यानंतर त्यांनी 'अल बलाग' नावाचे दुसरे साप्ताहिक सुरु केले व त्यात राजकीय लिखाण चालूच ठेवले. त्यामुळे १९१६ मध्ये ब्रिटीश सरकारने मौलाना आझादांना हद्दपार केले.

काँग्रेसचे नेते ३१ डिसेंबर १९१९ पर्यंत त्यांनी ब्रिटीश शासनाने रांची येथे स्थानबद्ध केले. १९२० च्या सुरुवातीला त्यांची सुटका झाली. मौलाना आझाद यांनी खिलाफत चळवळीत भाग घेतला.

१९२१ मध्ये पुन्हा ब्रिटीश सरकारने त्यांना कैद केले. ते ९ जानेवारी १९२३ पर्यंत कैदेत होते. १९२३ मध्ये दिल्ली येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्या अधिवेशनाचे मौलाना आझाद अध्यक्ष होते. मौलाना आझाद यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला. त्यांनी अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरुन भाषण करत असतांना म्हणाले की, 'जर आकाशातून देवदूत उतरुन म्हणू लागला की, हिंदू-मुस्लिम एकतेचा नाद सोडा. दोन तासात स्वराज्य देतो? 'तर मी म्हणेन, मला हिंदू - मुस्लिम ऐक्य हवे, त्यासाठी स्वराज्याला मी दूर लाटण्यास तयार आहे. स्वराज्य लांबले तर हिंदुस्थानचे नुकसान होईल, पण हिंदू-मुस्लिम ऐक्य नाहिसे झाले तर मानव जातीचे नुकसान होईल.

भारतीय राष्ट्रवाद व हिंदू-मुस्लिम ऐक्य याबाबत त्यांचे विचार महात्मा गांधी सारखेच होते. अहिंसेच्या बाबतीत मात्र त्यांचे विचार वेगळे होते. महात्मा गांधी हे तत्व किंवा जीवनाची निष्ठा मानत. मौलाना आझाद अहिंसेला एक हत्यार मानत असे.

मौलाना आझाद यांच्या मते स्वातंत्र्य हा मानवाचा नैसर्गिक व ईश्वराने दिलेला हक्का आहे. देवांचे सेवकांना गुलाम बनविण्याचा कोणालाही हक्क नाही. गुलामगिरी ही परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध आहे. त्यांनी स्वातंत्र्य, समता व बंधूता या तत्वांवर आधारलेल्या आधुनिक लोकशाहीचा पुरस्कार केला. मौलाना आझाद यांच्या नेतृत्वावर भारतातील सर्वच धर्मातील, जातीतील, स्तरावरील लोकांचा विश्वास होता. १९३० साली त्यांना कैद केले. १९३९ ते १९४६ पर्यंत ते काँग्रेसचे अध्यक्ष होते.

८ ऑगस्ट १९४२ साली अखिल भारतीय राष्ट्रीय सभेचे अधिवेशन मुंबई येथील गवालिया टँकवर भरविण्यात आले होते. ब्रिटीशांनी आपली सत्ता सोडून भारतातून निघून जावे म्हणून 'चलेजाव चळवळी' चा ठराव मंजूर झाला व ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटेपासूनच ब्रिटीश सरकारने काँग्रेसच्या नेत्यांना पकडण्यास सुरुवात केली. पकडलेल्या नेत्यांना आगगाडीने अहमदनगर येथे आणले. त्या नेत्यांमध्ये मौलाना अबुल कलाम आझाद, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, बॅ.असिफ अली, डॉ.महेमुद, डॉ.पी.सी.घोष, गोविंद वल्लभ पंत, पट्टाभि सितारामय्या, आचार्य नरेंद्र देव, आचार्य कृपलानी, हरेकृष्ण मेहताब यांनी अहमदनगरच्या भुईकोट किल्लयात कैदेत ठेवले होते. मौलाना आझाद यांनी अहमदनगरच्यां किल्लयात कैद असतांना 'गुब्बारे खातीर' हे पुस्तक लिहिले. मौलाना आझाद अहमदनगरच्या किल्लयात १०/८/१९४२ ते १८/४/१९४५ असे तीन वर्षे होते. १९४५ मध्ये सिमला परिषदेत व्हेवेल यांच्या योजनेवर चर्चा झाली. १९४६ मध्ये ब्रिटनच्या मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने बोलणी केली. या प्रत्येक वेळी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून मौलाना आझाद यांनीच पुढाकार घेतला.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर काही काळातच सरदार वल्लभभाई पटेल यांचेही निधन झाले. पंडित जवाहरलाल नेहरुंचे सहकारी व विश्वासपात्र मित्र मौलाना आझाद होते. पंडित जवाहरलाल नेहरुंच्या मंत्रीमंडळात प्रथम पासून शेवटपर्यंत मौलाना आझाद शिक्षणमंत्री या पदावर होते.

२२ फेब्रुवारी १९५८ रोजी नवीदिल्ली येथे मौलाना आझाद पैगंबरवासी झाले. त्यांनी लिहिलेले 'इंडिया विन्स फ्रीडम' (स्वातंत्र्याचे जन्मकाली) हे पुस्तक त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. १९९२ साली त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न पुरस्कार' देण्यात आला. मौलाना आझाद एक महान, लेखक, कवी, शायर, राष्ट्रीय नेतृत्व करणारे थोर मानवतावादी विचारवंत होते. अशा या महान क्रांतीकारकास व शिक्षणमंत्र्यास कोटी-कोटी प्रणाम !

**- आबीद दुलेखान,**
अध्यक्ष- मखदुम सोसायटी,
नगर. मो.९८६०४७७८६९

# शिक्षण दिन
## मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्मदिन



आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता.

शिक्षण पूर्ण झाल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी म ानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

# आमदार हे करतील का?

१) गणपती उत्सव व इतर सर्व धर्माचे उत्सवामध्ये रात्रभर चालणारे कर्कश डिजे बंद करतील का?

२) उत्सवात लेझर लाईटवर बंदी करतील?

३) सार्वजनिक स्वच्छता गृहाचा महिन्यात एकदा आमदार वापर करणार का?

४) सार्वजनिक स्वच्छतागृह सर्वसामान्य महिलांनी वापरण्यासारखे स्वछ व सुंदर वातावरण करतील का?

५) शहरात ३ एसटी स्टॉप आहे, सर्वच्या सर्व अस्वच्छ असतात यात बदल करतील का?

६) दहावी पर्यंतच्या मुला-मुलींना सिटी बस सेवा मोफत देणार का?

७) महिन्यात कमीत कमी एक वेळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये भेट देणार का?

८) नगर शहर पर्यटन स्थळ होईल यासाठी काही प्रयत्न करणार का?

९) नगरमधील मुलं-मुली शिक्षण पूर्ण झाले की पुण्या-मुंबईला जातात यासाठी आमदार काही करणार का?

१०) नगर एक खेडं आहे ही इमेज खोडण्यासाठी आमदार काही करणार का?

**सर्वसाधारण नगरकर व सहनशील व सदैव नम्र,**
**आशा नगरच्या नागरिकांचे प्रश्न**
**वरील विषय उघड्या डोळ्याने पाहणारा**
**सकल माळी समाज**
**राजेंद्र पडोळे**

# मैत्रीचा अखंड सहवास

***''मन असावे पाण्यासारखे नितळ***
***पण ते गढूळ नसावे***
***मन असावे काचेसारखे पारदर्शी***
***पण ते तडकणारे नसावे***
***मन असावे सागरा सारखे विशाल***
***पण ते झऱ्या सारखे उथळ नसावे''***



**मंदाकिनी डावरे**

४५ वर्षापासून मैत्री असलेली माझी अत्यंत प्रिय मैत्रिण मंदाकिनी डावरे ही ९ ऑक्टोबर रोजी आमच्या जीवनप्रवासातून निघून गेली. तिच्या आदर्शवत असणारे व्यक्तिमत्त्व सादर करण्याचा प्रयत्न!

माझी ही अत्यंत जवळची मैत्रिण तिच्याबद्दल काय आणि सांगावे? एक विद्यार्थीप्रिय शिक्षिका, हिंदी व इंग्रजी विषयावर अभ्यासू व प्रभुत्व होते. एक लेखिका- तीन कादंबऱ्या, १५ कथा प्रकाशित, केलेल्या पर्यटनाचे नियोजन व प्रवास वर्णने साप्ताहिक सकाळमध्ये प्रसिद्ध.



हिमालयातील पोखरा व्हॅली, कुलुमनाली, किश्तवाड, पिंडारी काफनी या ठिकाणी ट्रेकिंग! खेळामधील सहभाग, संगीताची आवड, पेंटींग करणे, कलाकौशल्याची आवड होती. यातील बऱ्याच बाबीत मी तिच्याबरोबर सहभागी झालेली आहे.

आमच्या आवडीनिवडी सारख्या तर होत्याच, पण आमच्यात कधीही वादविवाद, भांडणे, कलह, द्वेष कधीही होत नव्हता त्यामुळे आमचा मैत्रीचा प्रवास आनंददायी झाला.

मुख्यतः भाऊसाहेब फिरोदिया सारख्या आदर्श आणि चांगल्या शाळेत नोकरी करताना तेथील वातावरण, चांगले सहकारी, उत्तम नियोजनाचा मैत्री प्रवासासाठी फायदा झाला.

कुठल्याही चांगल्या गोष्टी आढळल्या की, त्या कृतीत आणण्यासाठी तिची खूप धडपड असे. त्या आमलात आणण्यासाठी ती अभ्यास करत असे. ते जिद्दीने करून निर्णय घेत असे. यामध्ये तिचा खूप पुढाकार असायचा हे महत्त्वाचे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करणे, सकारात्मक दृष्टिकोन, दुसऱ्यांना न दुखावणे, गोड बोलून सल्ला देणे, निष्काम वृत्ती हे तिच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. चुका दाखवण्याची विनयशीलता, कौतुकाचा उदारपणा होता. कोणतीही गोष्ट करताना, प्रसिद्धीची अपेक्षा नाही. मैत्रीचे नाव आंतरिक सौंदर्य. नाही कसला मोठेपणा, नाही कसला दिखाऊपणा.

व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात, पण काही व्यक्ती अशा असतात की त्या सर्वांच्याच मनात स्थान निर्माण करतात. आपल्या कुटुंबातील सर्व व्यक्तींची तिने काळजी घेतली.

मुलगा यतीन, सुन सोनाली, नात सौम्या त्यांना चांगले संस्कार दिले. डॉ. कुमार डावरे व सौ. जया डावरे हे मंदाचे भाऊ-वहिनी यांचे तिला उपचार, मार्गदर्शन आणि मोलाची साथ मिळाली हे इथे नमूद करावेसे वाटते.

***''दूर असली जरी जवळची वाटते***
***मनात मात्र सतत असते***
***ती मैत्रिण खूप हवीशी वाटते''***

''माणूस कुटुंबात जन्मतो, समाजात वावरतो, सामाजिक बांधिलकी मानतो, समाजात असलेले देणे फेडतो हे सगळ्यांनाच जमते असे नाही हे मंदाला तेही जमत गेले. अशी छान मैत्रिण मला मिळाली हे माझे भाग्यच!

तिच्या मैत्रीबद्दल म्हणावेसे वाटते,

**''मैत्री म्हणजे शब्दाशिवाय**
**एकमेकींच मत जाणून घेणं**
**कौतुकाची थाप देणं**
**एकमेकींचा आधार बनणं**
**मैत्री म्हणजे अतूट विश्वास**
**मैत्री म्हणजे अखंड आठवणींचा प्रवास**
**सुसह्य करणारी पाऊलवाट...''**

ही माझी मैत्रीण 'रंगात रंगुनी रंग माझा वेगळा' अशीच होती. ''आज आमच्यातून जात आहे, पण मला सतत आठवशील तू कुठेही असली तरी माझ्या मनात सतत असशील...''

**- सौ. लता रजनीकांत मुथा,** निवृत्त मुख्याध्यापिका
नगर- मो. ८६८७५२६०७३, ८६८६९०७२४८

# तुळशी विवाह - एक लोककल्याणकारी प्रथा !

भारतात कार्तिक शुद्ध एकादशी ते कार्तिक पौर्णिमा या कालावधीत घरोघरी तुळशी विवाह लावण्याचा प्रघात आहे. यंदा हा योग १२ ते १५ नोव्हेंबर दरम्यान असणार आहे. बहुतांश ठिकाणी द्वादशीला तुळशी विवाह केले जातात. कार्तिक शुद्ध एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही म्हणतात. या दिवशी श्री विष्णू निद्रावस्थेतून जागृत होतात आणि चातुर्मास संपतो. श्री विष्णूंच्या जागृतीचा जो उत्सव करतात त्याला प्रबोध उत्सव असे म्हणतात. त्याचाच एक भाग म्हणून तुळशी सोबत श्री विष्णूंचा विवाह लावला जातो. तुळशी विवाहानंतर देशभरात नियोजित विवाह लागायला सुरुवात होते. तुळशी विवाहाला श्री महालक्ष्मी आणि श्री विष्णूंच्या विवाहाचे प्रतीक मानले जाते. तुळशी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. हे व्रत करणाऱ्याला कन्यादानाचे फल मिळते असे मानले जाते. घरच्या कन्येस श्रीकृष्णासारखा आदर्श वर मिळावा यासाठीही दारात तुळशी विवाह करण्याची प्रथा आहे. त्यामुळे भारतात अनेक ठिकाणी घरोघरी तुळशी विवाह केले जातात. हिंदू धर्मात तुळस ही अत्यंत पवित्र मानली जाते. त्यामुळे प्रत्येकाच्या दारात ती पाहायला मिळते.

भगवान शिवाचाच अंश असलेला जालंधर नावाचा राक्षस त्याच्या अमाप शक्तीने उन्मत्त झाला होता. सर्व देवांसह इंद्रालाही त्याने पराभूत केले. त्याने विष्णू लोकावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला; मात्र देवी महालक्ष्मीने त्याला आपण बहीण भावासारखे आहोत हे समजावल्यावर त्याने कैलासावर आक्रमण करून देवी पार्वतीला पत्नी बनवण्याची योजना आखली. ज्यामुळे देवी पार्वती क्रोधीत झाल्या आणि श्री महादेवांना जालंधरशी युद्ध करण्यासाठी सिद्ध व्हावे लागले. जालंधरची पत्नी वृंदा ही पतिव्रता असल्याने तिच्या पातिव्रत्य धर्मामुळे जालंधरला शक्ती मिळत होती. परिणामी महादेवांनाही त्याला पराभूत करता येत नव्हते. जालंधरला पराभूत करण्याचा एकमेव मार्ग त्याच्या शक्तीचा स्रोत तोडणे हाच होता. अखेर भगवान श्रीविष्णूंनी जालंधरचे मायावी रूप घेतले आणि ते वृंदाच्या घरी गेले. जालंधरला पाहिल्यावर ती त्याच्याशी त्याच्या पत्नीप्रमाणे वागू लागली. जालंधरच्या रूपात त्यावेळी भगवान श्री विष्णू असल्याने वृंदाचे पातिव्रत्य भंग पावले ज्यामुळे महादेवांना जालंधरचा वध करता आला, वृंदाच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा तिने क्रोधीत होऊन श्री विष्णूंना श्राप दिला, 'ज्या प्रकारे छळ करून तुम्ही मला पती वियोग दिला आहे त्याचप्रमाणे तुमच्याही पत्नीचे छळपूर्वक हरण होऊन स्त्री वियोग सहन करण्यासाठी तुम्हाला मृत्यू लोकात जन्म घ्यावा लागेल'. पुढे श्री राम अवतारात श्रीविष्णूंना माता सीतेच्या रूपात पत्नीवियोग सहन करावा लागला. वृंदा पतीसोबत सती गेली. ज्या जागी ती सती गेली त्या जागी तुळशीचे रोप उत्पन्न झाले. ही तुळस श्रीविष्णूंना अत्यंत प्रिय आहे. एका कथेनुसार वृंदाने श्री विष्णूंना श्राप देऊन शाळीग्राम बनवले. त्यामुळे तुळशी विवाहाच्या दिवशी तुळशीसोबत श्री विष्णूचे रूप म्हणून शाळिग्राम ठेऊन त्यांचे लग्न लावले जाते. तुळशीविना श्री विष्णूची किंवा शाळीग्रामची पूजा कधीच पूर्ण होत नाही.

तुळस म्हणजे आपल्या घरातील कन्याच आहे या भावाने तिचे लग्न लावले जाते. दारातील तुळशी वृंदावनाला किंवा कुंडीला गेरू आणि चुन्याच्या साहाय्याने रंगरंगोटी केली जाते. कुंडीत बोर, चिंच, आवळा, सिताफळ, कांद्याची पात ठेवतात. दारात आणि अंगणात रांगोळी काढली जाते. कुटुंबातील कर्ता पुरुष तुळशीची आणि श्रीकृष्णाच्या मूर्तीची पूजा करतो. नंतर त्यांना हळद व तेल लावून मंगल स्नान घातले जाते. तुळशीला आणि श्रीकृष्णाच्या मूर्तीला बाशिंग बांधले जाते. तुळशीला नवीन वस्त्र पांघरतात आणि त्यावर मांडव म्हणून उसाची अथवा धांड्याची खोपटी ठेवतात. काही जण तुळशीच्या रोपट्याला साडी देखील नेसवतात.तुळशीला नवरीसारखे सजवण्यात येते. तिला साडी, चोळी, नथ, सोन्याचे दागिने घालतात. सोन्याचे मंगळसूत्र, चांदीची जोडवी घालतात. बाळकृष्ण आणि तुळस या दोघांमध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून त्यांचा विवाह लावला जातो. घरातील स्त्री तुळशीची ओटी भरते. तुळशीची आणि श्रीकृष्णाची आरती केली जाते. गोडाचा नैवेद्य दाखवला जातो. बऱ्याच ठिकाणी प्रसाद म्हणून ऊस आणि चुरमुरे वाटले जातात. गोवा, दीव आणि दमण येथे तुळशी विवाह सार्वजनिकरीत्या साजरा केला जातो. तुळशीची आणि बाळकृष्णाची वाजत गाजत सरकारी इतमामात मिरवणूक काढली जाते.

तुळस भारताच्या सर्व प्रांतात आणि सर्व वातावरणात उगवणारी वनस्पती आहे. तुळस केवळ पूजनीय आहे म्हणून ती दारासमोर लावली जात नाही, तर तिचे अनेक आयुर्वेदिक गुणधर्मही आहेत. तुळस नेहेमी सकारात्मक ऊर्जा प्रक्षेपित करत असते हे शास्त्रीयदृष्ट्याही सिद्ध झाले आहे. ज्या घराच्या दारात तुळस असते त्या घरात आजारपण कमी येते असे म्हटले जाते. हिंदू धर्मात तुळशीला अनन्यसाधारण महत्व आहे. तुळशीला पापनाशिनी असेही म्हटले जाते. तुळशीचे वन असलेल्या परिसरातील कोसभर भूमी गंगेसारखी पवित्र बनते असा संदर्भ स्कन्दपुराणात आढळतो. 'तुळशीच्या वनस्पतीत मुळापासून अग्रापर्यंत सर्व देवता वास्तव्य करतात', असे म्हटले जाते. देवाला नैवेद्य दाखवतांना तुळशीच्या पानांचा वापर केल्याने नैवेद्य देवतेपर्यंत लवकर पोहोचतो तसेच तो अधिक सात्विक बनतो.

श्वासाची दुर्गंधी घालवण्यासाठी तुळस अत्यंत उपयुक्त आहे. यासाठी सकाळी आणि सायंकाळी तुळशीची एक ते दोन पाने चघळावीत. तुळशीची ताजी पाने प्रतिदिन खाल्ल्याने शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढते. शरीरातील टॉक्सिस बाहेर काढून फुप्फुसांची कार्यक्षमता वाढवण्याचे कामही तुळस करते. सर्दीमुळे कफ़, खोकला झाल्यास त्यावर तुळस अत्यंत गुणकारी आहे. सर्दीसाठी काढा बनवताना त्यामध्ये तुळशीची पाने टाकावीत. मासिक पाळी अनियमित येण्याच्या समस्येमध्येही तुळस खाणे लाभकारक आहे. स्मरणशक्ती वाढीसाठी लहान मुलांना तुळशीची २-३ पाने नियमित खायला द्यावीत. तुळशीमधील विषाणूनाशक गुणधर्मामुळे जखम लवकर बरी होण्यासाठी तुळस तुरटीमध्ये मिश्र करून लावली जाते. तुळशीच्या सेवनामुळे मेंदूला ऊर्जा मिळते त्यामुळे डोकेदुखीच्या समस्येतही तुळस लाभदायक आहे. तुळशीच्या नियमित सेवनाने शरीरातील ऊर्जा संतुलित राहते परिणामी ताण तणावांपासूनही मुक्ती मिळते. असे एक ना अनेक लाभ तुळशीपासून मिळतात. दर वर्षी दारात तुळशीचे लग्न लावावे असा हिंदू धर्मात प्रघात आहे. त्यामागे कथेची जोड असली तरी लग्न लावण्यासाठी का होईना प्रत्येक कुटुंबाने आपल्या दारासमोर तुळशी वृंदावन करून त्यात तुळस लावावी आणि वर्षभर तिचे पोषण करावे हा यामागील हेतू असावा. कारण त्यायोगे घरात प्राणवायूसह सकारात्मक ऊर्जेचा स्रोत येत राहावा, तुळशीच्या पानाच्या नियमित सेवनाने लहान सहन आजार दूर राहावेत, कुटुंबातील सर्वांची प्रकृती सुदृढ राहावी. कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित राहावे जेणेकरून कुटुंबात सुख, समाधान आणि शांती कायम टिकून राहील. आपल्या प्राचीन ऋषी मुनींचे संशोधन किती उदात्त आणि अत्युच्च पातळीचे होते हे या एका उदाहरणावरून आपल्या लक्षात आले असेल.

## ‘सिद्धार्थ वाणी’

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ उनका चातुर्मास सावेडी मे है।



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

**उपाध्याय कस्तूरचन्द मुनि**

अमूल्य रत्नानी परिपूर्ण ज्योतिर्मान भारत भूमीचा रमणीय-कमणीय आंचल निर्मळ किती पवित्र, किती सौभाग्यशाली आहे? हे कोणापासूनच लपलेले नाही. रत्नगर्भा वसुन्धरा स्वतःमध्ये असंख्य रत्ने दडवून बसलेली असताना, त्याचवेळी तिच्या प्रदेशात वेळोवेळी असे असंख्य स्त्री-पुरुष जन्माला आले. ज्यांच्या जीवनाचा प्रकाश जगभर उजळून निघाला आहे आणि भविष्यातही तसाच राहील.

राजस्थान राज्यालाही अशीच प्रसिद्धी मिळाली आहे. या विस्तीर्ण प्रांताचा प्रत्येक भाग आपल्या आगळ्यावेगळ्या प्रतिमेचे अनोखे आणि सौंदर्याचा नमुना सादर करत आला आहे. हे बघून प्रत्येक जीवाला आक्रोश होणे स्वाभाविक आहे. त्याच नयनरम्य वातावरणात वाढलो, निसर्गाच्या पवित्र कॅनव्हासवर निसर्गरम्य ठिकाण असण्याचा बहुमान लाभलेले निंबहेरा गाव

श्रीमान टेकचंदजी गेंदीबाई या पवित्र ठिकाणी आपले वैवाहिक जीवन व्यतीत करत होते. त्यांचे वैवाहिक जीवन हे धार्मिक स्नेह, सौजन्य भक्ती आणि धार्मिक प्रतिष्ठेचे सुंदर आणि नयनरम्य मंदिर होते. १९३० कार्तिक शुक्ल ८ मंगळवार पहाटे जीवन निर्मात्याचा जन्म झाला. नाव आणि गुणांनुसार सार्थक नाव ‘खुबचंद’ ठेवण्यात आले. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे त्यांनी हिंदी, उर्दु आणि गणितात समाधानकारक यश संपादन केले आणि लहान वयातच काव्यरचना केली. किशोर खुबचंद यांच्याकडून उत्तरोत्तर प्रगतीसाठी कुटुंबियांना त्याच्याकडून खूप आशा होत्या. लहानपणापासूनच ते स्वभावाने सौम्य, वागण्यात गोड, विनयशील आणि मृदुभाषी होते. चेहऱ्यावर आनंद सहज दिसत होता. हळूहळू सिरलताप्रमाणेच शरीर, वय आणि व्यावहारिक अनुभव यातून त्यांचा विकास होत राहिला. आईवडिलांच्या इच्छेने ते विवाह बांधले गेले. त्याच्या विरुद्ध लग्न झाले. ते गुरुदर्शनाची तहानलेले होते. त्यांच्याकडे तात्त्विक मन होते. तारुण्याच्या उमलत्या बहरातही ते अतिशय संयमी जीवन जगले. श्री नंदलालजी म.सा. यांच्या संयम घेण्याचे ठरवले. घरातून नकार होतो. सर्वांना समजावून शेवटी त्यांनी संयम घेतले. वि.सं. १९६२ कार्तिक शुक्ल १३ गुरुवार की मंगल बेलापर दिक्षा संपन्न झाली.

**चौथमलजी म. साहेब का जन्म जयंती**

मुनिश्री चौथमलजी महाराजांचा जन्म मालव भूमीतील नीमच शहरात कार्तिक शुक्ल त्रयोदशीला रविवारी १९३४ मध्ये गंगारामजीच्या धर्मपत्नी श्रीमती केसरबाई यांच्या रत्नकुक्षीपासून झाला. जन्मानंतर मुलाचे नाव चौथमल ठेवण्यात आले. त्याला त्यांच्या पालकांकडून धर्माची मूल्ये वारशाने मिळाली.

भगवान महावीर को श्रमण परंपरामध्ये जैन दिवाकर मुनिश्री चौथमलजी महाराज विलक्षण प्रतिभा संपन्न संत रत्न होते. त्यांच्या जीवनात वाणी आणि आचरणचा अभूतपूर्व होता. त्यांनी प्रथम त्याच्या कृतीकडे पाहिले आणि नंतर त्याचे शब्द जगले. मुनिश्री हे वाणीचे जादूगार होते. चौथमलजी महाराज साहब ने जीव हिंसा मदिरापान, मांसाहार करण्याचा संकल्प देवून पूर्ण देशात क्रांतिकारी परिवर्तनचा शंखनाद करत होते.

२४ जानेवारी २०२१ मध्ये पुस्तकचा वितरण : प्रसिद्ध वक्ता, पंडित रत्न मुनिश्री चौथमलजी महाराज ने ह्या पुस्तकात फार सरळ आणि सुन्दर भाषामध्ये केले गेले आहे. पुस्तक एक मनोरंजक उपन्यास आहे आणि एकदा शुरू झरने नंतर सोडण्याचा मन नाही होत.

झोपती ते महल पर्यंत महावीर स्वामींचा प्रचार केला. त्यांच्या वाणीने शिकारी सुद्धा शिकारी सोडून धर्मआराधना करत शराब, दारू पिणारी सुद्धा पिणं सोडलं, वेश्याने सुद्धा आपले काम सोडून धर्म आराधनेत रमू लागले.

राजा महाराजा ह्यांना धर्म शिकवले. आदिवासी लोकात ते फार प्रसिद्ध झाले. त्यांचा गावात फार प्रभाव होता. जैनचा प्रचार केला. कोटा, राजस्थान, मध्यप्रदेश, आजूबाजूचे गाव ह्याच्या घरात दुकानात त्यांचे फोटो आहे. एकदा गुरुदेव जात होते, तेव्हा त्यांनी एक बैलगाडी पाहिली. त्यात आदिवासी जोडपे होते व त्यांचा वीस वर्षाचा मुलगा होता, तो फार आजारी होता. गुरुदेवनी विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, ह्याला काही तरी आजार झाला आहे, तेव्हा गुरुदेवनी त्याला मंगलीक ऐकवून पुढे गेले. तीन दिवसात मुलगा एकदम बरा झाला, तेव्हा त्या कुटुंबानी गुरुदेवकडे जाऊन प्रणाम करून शपथ घेतली की कधीही मांस मदिरा घेणार नाही, असे गुरुदेव करुणानिधि होते. मालवा देश आणि पूर्व देश हा दिवस साजरा करतात.

**– सौ. सविता चोरडिया**

---

# शहरासाठी कार्यरत हाच श्वास... शहर विकासाचा एकच ध्यास...



आ.संग्राम जगताप

**माझ्या नगरकरांशी हितगुज – भाग १**

वारकरी संप्रदायाचा वारसा जतन करत सामाजिक कार्यातून मी राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवलं. समाजकारण आणि राजकारण सेवाभावाने करण्याचे मनाशी ठरवले. आपल्या शहरात सकारात्मक वातावरण तयार झाले पाहिजे यासाठी राजकारण प्रभावी माध्यम असल्याचे मला जाणवले. अगदी विद्यार्थी दशेपासून समाजकार्याची सुरुवात केल्यावर माणसं समजून घेणं, माणसं जोडणं यावर भर दिला.

प्रेरणा प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक कार्यास गती मिळाली. २००९ साली मी नगरसेवक झालो आणि लोकआग्रहास्तव महापौरपद भूषविण्याची संधी मिळाली. युवा महापौर म्हणून कौतुक होताना शहरवासी माझ्याकडून नागरी समस्या सुटाव्यात ही माफक अपेक्षा करत असल्याचे लक्षात आले. नगरचे मूळ प्रश्न समजून घेतले. समाजाच्या विविध स्तरातील लोकांशी संवाद साधून समस्या सोडवताना शहराला विकासाच्या दिशेने कसे नेता येईल? याचा विचार करू लागलो. केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्यानेच शहर विकासाचा मार्ग खुला होईल, हे ध्यानी घेऊन विविध योजनांकरिता पाठपुरावा करून त्यास मंजूरी मिळवण्यास सुरूवात केली. फेज टू पाणी योजना मंजुर करून आणली. आज शहराला मुबलक पाणी पुरवठा होत आहे तो ही योजना पूर्ण झाल्यामुळेच !

मला राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर जिल्हाध्यक्षपदाची संधी मिळाली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारीही मिळाली. नगरकरांनी परिवर्तन घडविण्याचा निर्धार करीत आणि विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मला विश्वासाने विधानसभेत पाठवले. पहिल्या पाच वर्षांच्या आमदारकीच्या कार्यकाळात राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून शहरातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणला. त्यामुळे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत नगरकरांनी जणू निवडणूक हाती घेवून मला पुन्हा विजयी केले. नगरकरांचा हाच विश्वास मला बळ देणारा ठरला.

नियोजनपूर्वक विकास करण्याचे धोरण ठेवून मी वाटचाल सुरु केली. सांडपाणी व्यवस्थापन, पाणी, रस्ते या मूलभूत सुविधा क्रमाक्रमाने मार्गी लावण्यात यश आले आहे. त्यामुळे निधीचा योग्य विनियोग होवून शाश्वत विकासकामे नगरकरांनी पाहिली. रस्त्यांच्या विकासासाठी १५० कोटींचा भरीव निधी नगरच्या इतिहासात प्रथमच मला मिळवता आला. या निधीतून आज जी कामे सुरु आहेत, ती येत्या काही महिन्यांत पूर्ण झाल्यावर नगरचा चेहरामोहरा बदललेला दिसणार आहे.

नगर शहरात बदल होऊ शकतो, विकास होऊ शकतो असा विश्वास प्रत्येकाच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न मी केला. राजकारण फक्त निवडणुकीपुरते ठेवायचे असते, इतर वेळी आपण फक्त समाजासाठी, आपल्या नागरिकांसाठी अहोरात्र झटायचे या धोरणानुसारच नगरकरांच्या सेवेत कार्यमग्न राहिलो आहे, असे आ.संग्राम जगताप म्हणाले.

---

## मेट्रो सिटीच्या स्वप्नपूर्तीसाठी लाडक्या भैय्याला पुन्हा संधी द्या

**शितल जगताप यांचे आवाहन**

नगर – विकासकामांनी आ. संग्राम जगताप यांनी शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. पूर्वीचे नगर आणि आताचे नगर शहर यात मोठा बदल झाला आहे. संग्राम जगताप यांच्या मेट्रो सिटीची स्वप्नपूर्ती होण्यासाठी सर्व लाडक्या बहिणींनी आपल्या लाडक्या भैय्याला पुन्हा एकदा संधी द्यावी, असे आवाहन माजी नगरसेविका शीतल जगताप यांनी करून शहरातील महिलांनी २० नोव्हेंबरला कंटाळा न करता वेळ काढून आपला मतदानाचा हक्क बजावावा, असेही आवाहन केले.



आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ शीतल जगताप यांनी प्रभाग ८ मधील विविध भागांमध्ये प्रचार फेरी काढून महिलांशी संवाद साधला.

महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका शीतल जगताप यांनी प्रभाग ८ मधील विविध भागांमध्ये प्रचार फेरी काढून महिलांच्या बैठका घेतल्या. यावेळी मनीषा दातरंगे, शितल दातरंगे, रूपाली दातरंगे, शारदा दातरंगे, सुरेखा आगरकर, सुनिता दातरंगे, हिराबाई आंबेकर, चंदाबाई आंबेकर, माधुरी आगरकर, विजया दातरंगे, रंजना दातरंगे, मनीषा दातरंगे, अलका दातरंगे यांच्यासह दातरंगे मळा परिसरातील परिसरातील महिला उपस्थित होत्या.

यावेळी शितल दातरंगे यांनी आ.संग्राम जगताप यांनी केलेल्या विकास कामांची व राज्य सरकारच्या महिलांसाठीच्या योजनांची माहिती दिली. शहरातील रस्ते ड्रेनेज उद्याने पाणी प्रश्न आदी प्रश्न आ.जगताप यांनी सोडवले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण सारख्या अनेक योजनांचा सुमारे एक लाख महिलांना लाभ मिळवून दिला आहे. त्यामुळे शहरातील सर्व महिला आ.जगतापांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून त्यांना मंत्रिमंडळात पाठवल्याशिवाय या बहिणी गप्प बसणार नाहीत, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

---

खा. निलेश लंके, प्रसादराव तनपुरे, आमदार सत्यजित तांबे, दादाभाऊ कळमकर, अभिषेक कळमकर यांच्या उपस्थितीत

# एमआयडीसीतील समस्यांवर उद्योजकांशी १२ नोव्हेंबरला ‘वन टू वन’ संवाद कार्यक्रम



नगर – एमआयडीसीतील विविध समस्यांसंदर्भात उद्योजकांशी वन टू वन संवाद कार्यक्रमाचे १२ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता एमआयडीसी जिमखाना येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात खा. निलेश लंके, माजी खासदार प्रसादराव तनपुरे, आमदार व उद्योजक सत्यजित तांबे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर व आघाडीचे पदाधिकारी एमआयडीसीतील समस्यांविषयी उद्योजकांशी संवाद साधणार आहेत.





उद्योजक मित्र, एमआयडीसी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

---

## कर्जत जामखेड विधानसभा समन्वयक म्हणून प्रा. भानुदास बेरड



नगर – प्रदेश भारतीय जनता पक्षाने राज्यातील ५५ मतदारसंघात विधानसभा निवडणुक समन्वयक नियुक्त केले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव – पाथर्डी व कर्जत – जामखेड विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुक समन्वयक नियुक्त करण्यात आले आहेत.

कर्जत जामखेड विधानसभा निवडणुक समन्वयक म्हणून माजी जिल्हाध्यक्ष व प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रा. भानुदास बेरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर पाथर्डी शेवगाव विधानसभा मतदारसंघात माजी खासदार प्रितम मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुक समन्वयकांनी पुर्ण वेळ आपआपल्या विधानसभा मतदारसंघात उपस्थित राहुन पक्षाच्या प्रचार व व्यवस्थापन, बुथ यंत्रणा क्रियाशील राहील हे पाहणे आवश्यक आहे.

---

# केडगावकरांच्या विकासासाठी विशेष योजना राबवणार

**अभिषेक कळमकर यांचे आश्वासन; तुतारीच्या बाजूने जनाधार देणार : प्रचार फेरीत नागरिकांची प्रतिज्ञा**

नगर – केडगावकरांशी संवाद साधत त्यांना शहराच्या विकासासाठी विशेष योजना राबवण्याचे आश्वासन महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी दिले. त्यांनी विशेषत: फक्त महिलांसाठी उपनगरात आरोग्य केंद्र उभारण्याचे वचन दिले, ज्यामुळे महिलांना सहज उपलब्ध असणारी आरोग्य सुविधा मिळेल. केडगावचा सर्वांगीण विकास माझ्यासाठी प्राथमिकता आहे, आणि त्यासाठी मी कटिबद्ध आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.





महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी केडगावमध्ये प्रचारफेरी काढली. यावेळी महिलांनी त्यांचे औक्षण केले.

केडगाव येथे अभिषेक कळमकर यांच्या प्रचार फेरीला प्रतिसाद मिळाला. शेकडो नागरिक, विशेषत: युवकांचा सहभाग पाहून वातावरण जल्लोषमय झाले होते. तुतारी चिन्हाच्या बाजूने जनाधार देण्याचा निर्धार केडगावकरांनी या प्रचार फेरीतून ठामपणे व्यक्त केला. केडगाव यंदा तुतारी वाजवणार असा जनतेचा नारा या फेरीतून घुमत होता, ज्यामुळे मतदारांच्या मनात अभिषेक कळमकरांविषयी विश्वास आणि सकारात्मकता अधिक दृढ झाली आहे.

या प्रचार फेरीत महाविकास आघाडीचे विक्रम राठोड, दिलीप सातपुते, ओंकार सातपुते, संग्राम कोतकर, हर्षवर्धन कोतकर, अशोक दहिफळे, पप्पू भळे, मुन्ना भिंगारदिवे यांच्यासह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

फेरीच्या मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी अभिषेक कळमकर यांचे स्वागत केले, त्यांना फुलांच्या वर्षावाने सन्मानित केले, तसेच शुभेच्छा दिल्या. अनेक ठिकाणी महिलांनी औक्षण करून कळमकर यांना आशीर्वाद दिला. शहरातील सर्ववर्गीय नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आणि अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न कळमकर यांनी केला. रोजगार, आरोग्य, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी संधी, आणि सार्वजनिक सोयी-सुविधांचा विकास यांसारख्या मुद्द्यांवर त्यांनी चर्चा केली. केडगावकरांना आपल्या योजनांची माहिती देत असताना त्यांनी या विकास प्रक्रियेत सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग वाढवण्याचा संकल्प व्यक्त केला. प्रचार फेरीतून केडगावकरांनी दिलेला प्रतिसाद पाहता आगामी निवडणुकीत अभिषेक कळमकर यांना तुतारी चिन्हावरून केडगावकरांचा भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास त्यांच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

---

# सावेडीत चेन स्नॅचिंग करणारा आरोपी पोलिसांनी पकडला

**चोरलेली चेन हस्तगत, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड वर गुरुवारी (दि.७) सायंकाळी रस्त्याने पायी चाललेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची हिसका मारून तोडून नेणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. त्याच्या कडून चोरलेली चेन हस्तगत करण्यात आली आहे. बलराम उर्फ बल्ली रामचिंत यादव (वय २५, रा.सरस्वती कॉलनी, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर) असे या आरोपीचे नाव आहे.





सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड वर चेन स्नॅचिंग करणारा आरोपी पकडल्यावर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

चेन स्नॅचिंग बाबत अलका रमेश कांबळे (वय ६९, रा.किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड, सावेडी) यांनी गुरुवारी रात्री तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा समांतर तपास करून आरोपी पकडण्याचे आदेश पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पो.नि. दिनेश आहेर यांनी उपनिरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, मनोहर गोसावी, गणेश भिंगारदे, संतोष खैरे, बाळासाहेब गुंजाळ, विशाल तनपुरे, रमिजराजा आत्तार व मेघराज कोल्हे यांचे पथक नेमले व त्यांना तपासाबाबत मार्गदर्शन व सूचना केल्या.

सदर पथकाने गुन्ह्यांचे तपासामध्ये घटनाठिकाणी भेट देवुन सीसीटीव्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध सुरु केला. हा तपास सुरु असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी बल्ली यादव याने केला असून तो आता ढवणवस्ती, माऊलीनगर येथे आलेला आहे. ही माहिती मिळताच तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन संशयीत आरोपीचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले.

या आरोपीकडे गुन्हयांचे अनुषंगाने विचारपुस करता त्याने सदरचा गुन्हा त्याचेकडील होंडा शाईन कंपनीचे मोटार सायकलवर केलेला असून गुन्हयातील मुद्देमाल हा अक्षय ज्वेलर्स, लोणी येथील मिरा बनसोड यांना विकल्याची माहिती दिली. तपास पथकाने पंचासमक्ष अक्षय ज्वेलर्स, लोणी येथून ५० रूपये किंमतीची सोन्याची लगड तपासकामी जप्त केली आहे. ताब्यातील आरोपी बलराम उर्फ बल्ली यादव याला गुन्ह्याचे तपासकामी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

---

# अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणाऱ्या ३ कॅफेंवर पोलिसांची कारवाई

नगर – गाळ्यामध्ये प्लायवुडचे कंम्पार्टमेंट करून शाळा, कॉलेजमधील मुला-मुलींना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणाऱ्या तीन कॅफेंवर तोफखाना पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी तीनही कॅफे चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पंपिंग स्टेशन रोड, ताठे नगर येथे गोल्ड स्टार कॅफे, द्वारकाधीश कॉप्लेक्स, श्रीराम चौक येथे लव्ह बर्ड कॅफे, पारिजात चौक, गुलमोहर रोड येथे हंगरेला कॅफे या ठिकाणी कॉफी शॉपचा बोर्ड लाऊन कुठलेही कॉफी अथवा खाद्य पदार्थ विक्रीसाठी न ठेवता लाकडी कंपार्टमेंट तयार करून मुला-मुलींना बसण्यासाठी व अश्लील चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिल्याची माहिती पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांना मिळाली होती. त्यानुसार तीनही ठिकाणी रविवारी (दि.१०) दुपारी तोफखाना पोलिस ठाण्याच्या पथकाने छापे टाकून कारवाई केली. कॉफीशॉप मध्ये दर्शनी भागात कॉफीशॉपचा परवाना नव्हता. कॉफी बनविण्यासाठी लागणारे साहित्य, गॅस किंवा इतर साहित्य नव्हते. या ठिकाणी अश्लील चाळे करण्यासाठी आडोशासाठी लावण्यात आलेले पडदे तात्काळ काढून टाकण्यात आले. मुला-मुलींना तोंडी समज देऊन सोडण्यात आले.

या प्रकरणी गोल्ड स्टार कॅफेचा मालक ओंकार कैलास ताठे (वय २३, रा. ताठे नगर, सावेडी), लव्ह बर्ड कॅफेचा चालक ऋषिकेश सखाराम निर्मळ (वय २४, रा.श्रध्दा हॉटेल शेजारी) हंगरेला कॅफेचा चालक ओमकार दत्तात्रय कोठुळे (वय २५, रा. भूतकरवाडी चौक यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १२९, १३१ (क) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**पोलिसांचे नागरिकांना आवाहन**

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कॉलेज, क्लासेसला जाणाऱ्या मुला मुलीच्या नातेवाईकांनी आपल्या पाल्याच्या वर्तनुकीवर बारकाईने व जबादारीने लक्ष ठेवावे. आपल्या पाल्याचे मित्र कोण आहेत, ते बाहेर काही टवाळखोरी करतात काय? या बाबत बारकाईने लक्ष ठेवावे. यापुढे असे टवाळखोर व सार्वजनिक ठिकणी बेशिस्त वर्तनुक करणारी तरुण आढळुन आल्यास तोफखाना पोलीस स्टेशनकडून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी केले आहे.

